

समरसता

साहित्य पत्रिका

वर्ष ७, अंक १, सप्टेंबर २०२६



एकांत

लोकांच्या गर्दी पासून दूर आले
तेव्हा स्वतःला भेटले
इतरांना समजून घेताना
मी स्वतःलाच विसरले

आता एकांत आवडतो मला
कारण तो काही मागत नाही
मी जशी आहे तसा स्वीकारतो
माझ्यात दोष शोधत नाही

आरशात पाहताना आता
प्रश्न मनात कोणाचा नसतो
लोकांना मी कशी वाटते यापेक्षा
फक्त स्वतःसाठी जगायचं हा असतो

एकांताने शिकवलं मला
स्वतःची साथ मोठी असते
जग जरी दूर गेले तरी
स्वतःची साथ पुरेशी असते

आता एकटेपणा नाही वाटत
कारण मी माझ्यासोबत आहे
जग मला शोधत राहू दे
मी मात्र स्वतःमध्ये राहून सुखात आहे

– संस्कृती कांबळे

सावळा

तुझ्या सावळ्या रंगाची
माझ्या पाठीशी सावली
तूच सखा, तूच त्राता
तूच माझी रे माऊली ।।

तुझ्या सावळ्या तेजाचे
मनी भारले आभाळ
मुग्ध वेणूच्या नादाने
मन दंगते ओढाळ ।।

तुझ्या सावळ्या मायेने
गळो अहंभाव सारा
एक तत्त्व मुखी नाम
तुटो जगाचा पसारा ।।

तुझ्या सावळ्या प्रेमात
माझे गुंतलेले मन
देह, चित्त सारे काही
तुझ्या ठायी समर्पण ।।

सावळाच तुझा ध्यास
गात्रांतून माझ्या वाहो
वेड्या राधेच्या अंतरी
सदा कृष्णजन्म होवो ।।

– मानसी फडके

मोह मोहिनी

मोह मोहिनी वैरीण मोठी
टाकीत जाते अवघड जाळे
मनात उडतो गोंधळ भारी
जडते बुद्धिस पक्के टाळे

वैरीण असती इच्छा काही
अतृप्ततेचा माठ भरेना
धाव धावतो खुळ्यापरी मी
काही केल्या हाव सरेना

वैरीण असते झोळी अपुली
उदर कधीही तिचे भरेना
असते वैरीण काम वासना
एका जागी कधी ठरेना

असते कधीतरी वैरीण वाट
जाते घेऊन वाम दिशेला
डोळे असुनी अंध असा मी
मला दिसेना सूर्य उदेला

ठार करावी वैरीण वाटे
परि मोहिनी नाच नाचते
जादू होते कशी कळेना
अधिक मोहिनी मला त्रासते

– पद्माकर भावे

समरसता
साहित्य पत्रिका

वर्ष ७, अंक १, सप्टेंबर २०२६

संपादक
रवींद्र गोळे
संपादक मंडळ
प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे
डॉ. रमा गर्गे
प्रा. गजानन होडे
प्रकाशक
समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र

अंतरंग

महात्मा फुले आणि शिक्षण ४
काय वानू या संतांचे उपकार! ११
'नामशेष झालेल्या गोष्टी' १५
आम्ही मातीचे सांगाती २०
ग्रंथस्पंदन २४
काव्यफुले :
समाजप्रबोधनाची सुमने! २६
मनातला पाऊस! ३०
चालविशी हाती ३६
विनाशपर्व :
एका वैचारिक युद्धाचा प्रारंभ ३८
गाढवी सोनार समाज ४३
कविता :
मानसी फडके, संस्कृती कांबळे,
पद्माकर भावे

मुखपृष्ठावरचे चित्र
अंतरजालावरून साभार
मांडणी/अक्षरजुळणी आस्वाद प्रकाशन

संपर्क : संपादक समरसता साहित्य पत्रिका
१/६ जैन इस्टेट, विलेज रोड,
भांडूप (प.), मुंबई – ७८
इमेल : samarastaedit@gmail.com

खाजगी वितरणासाठी



सध्या गणेशोत्सवाने समाजमन आनंदी असतानाच त्यात मिठाचा खडा टाकणाऱ्या अनेक छोट्या मोठ्या घटना आपल्या आसपास घडत आहे. स्वाभाविकच आपण या साऱ्या मुळे अस्वस्थ झाले आहोत. या घटनेचे पडसाद सामाजिक जीवनही अस्वस्थ करत आहेत. आणि त्याचे दिर्घकालीन परिणाम ही जाणवत राहतील.

अशा ताणतणाव निर्माण करणाऱ्या घटना घडल्या की त्या मागचे जात वास्तव मांडले जाते. पिडित आणि शोषक अशा दोन गटात विभागणी करण्यात येते व दोन्ही बाजूंनी न्याय भूमिका घेण्यापेक्षा न्यायालयाची भूमिका घेऊन आरोप प्रत्यारोपाची राळ उडवली जाते. मूळ घटना, त्याचे संदर्भ झाकोळून टाकत आपल्या जाती अहंकाराचे ताबूत नाचवले जातात. या पार्श्वभूमीवर समरसतेचे कार्यकर्ते म्हणून आपली जबाबदारी खूप वाढते आहे.

आपण निंदोष, एकसंघ सुसंघटित हिंदू समाज निर्माण करण्यासाठी काम करत आहोत. आपण कोणत्याही एका जातीचे, गटाचे प्रतिनिधित्व करत नाही. तर संपूर्ण हिंदू समाजाचे आपण पक्षधर आहोत. हे आपल्या कायम लक्षात असले पाहिजे. आणि त्याचे प्रकटीकरण आपल्या लेखन, विचारातून झाले पाहिजे. हा समरसता साहित्य परिषदेचा कायम आग्रह आहे, असेल.

समरस समाज हे आपले स्वप्न आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी आपण कायम सिद्ध असले पाहिजे.

– रवींद्र गोळे



महात्मा फुले आणि शिक्षण

महात्मा फुले यांनी ईश्वरासाठी 'निर्मिक' हा शब्द वापरला. 'निर्मिक' म्हणजे निर्माण करता... ईश्वर ही कल्पना कर्मठपणाशी निगडित असणारी आहे. ज्योतिबा हे मूर्तीपूजक होते आणि मूर्तीभंजकही होते. त्यांना जुनं नष्ट करायचं होतं. जुने विचार नष्ट करायचे होते. मूर्ती भंजकाच्या डोक्यात नवीन मूर्ती निर्माण करण्याचं सामर्थ्य असावे लागतात ते त्यांच्यात होते. ज्योतिबांनी धर्माच्या भूमिकेतून स्त्रियांकडे पाहण्याची एक विशिष्ट धारणा निर्माण केली. स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणून त्यांना आपण ओळखतो.

डॉ. विजय फकीरा राठोड

९३२५२९०२७०

सातारा जिल्ह्यात कटगून हे गाव... साताऱ्यापासून २४ मैल अंतरावर... हे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पणजोबांचे गाव... ज्योतिरावांचे पणजोबा त्या गावाचे चौगुले पाटील... चौगुले हे गाव कारभारातील अत्यंत महत्त्वाचे पद त्यावेळी मानले जायचे... पूर्वी बारा बलुतेदारांची पद्धत होती. प्रत्येकाचे काम ठरलेले. कुलकर्णी, पाटील अशा महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या दप्तरांची ने-आण करणे, पिकाची पाहणी करणे, शेतसारा वसूल करताना मदत करणे हे सगळे काम चौगुले यांचे.... एके दिवशी ज्योतिरावांचे पणजोबा आणि कुळकर्णी यांच्या वादावादी झाली... कुलकर्णी यांनी अधिकाराचा वापर करून चौगुले यांचा छळ सुरू केला... चौगुलेंना छळ सहन झाला नाही. इमाने इतबारे सेवा करूनसुद्धा कुलकर्णी आपल्या कामाची कदर करीत नाही, आपल्याला त्रास देतो हा विचार मनात सातत्याने घोळत राहिला आणि त्याचा परिणाम असा झाला की शेवटी महात्मा ज्योतिराव फुले यांचे पणजोबा यांनी कटगूण गाव सोडून पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातल्या खातवाडी या गावी स्थायिक झाले. इथेच त्यांना शेटीबा हे ज्योतिरांचे आजोबा जन्माला आले. शेवटी या सगळ्या गोष्टींचा जमाखर्च पूर्ण होत नसल्याने हे कुटुंब पुण्यात आले. तिथे त्यांना तीन मुले झाली. राणोजी, कृष्णा आणि गोविंदा. गरिबीमुळे मिळेल

ते काम करणे, मोलमजुरी करणे... एके दिवशी फुलांच्या व्यापाऱ्याकडे त्यांना नोकरी मिळाली. कष्टाशिवाय पर्याय नाही हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून त्यांनी स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. आणि पुण्यातल्या एका प्रमुख व्यापारात व्यापारी म्हणून त्यांची गणना होऊ लागली. त्यांचे नाव पेशव्यांपर्यंत पोहोचले. विशेष म्हणजे पेशव्यांनी त्यांच्या कामाची कदर केली. पेशव्यांनी फुलापासून गाद्या, उषा, पोशाख बनवून पुरवण्याचे काम त्यांना दिले. त्या तिघे भावंडांना कामात आपले कसं पणाला लावावे लागले. त्यांच्या कामातील कौशल्य पाहूनच पेशव्यांनी त्यांना आपल्या बागेतील माळी या पदावर नेमणूक केली. एवढेच नाही तर त्यांना ३५ एकर जमीन बक्षीस म्हणून दिली. या ३५ एकरात त्यांनी फुलांची बाग फुलवली. या व्यवसायात त्यांनी स्वतंत्र असा ठसा निर्माण केला. पुढे सर्वार्थाने यांना फुले या नावानेच सगळेजण ओळखू लागले. ज्योतिरावांचे मूळ आडनाव 'गोरे.' आता ते 'फुले' झाले.

गोरे आडनावाचे ज्योतिराव हे फुले आडनावाचे झाले. याला कारण हेच कुटुंबांचा व्यवसाय आणि व्यवसायाबरोबर चालत असलेली रोजीरोटी या सगळ्या गोष्टींचा विचार केला आणि धंद्यात यश मिळवले. कालांतराने पेशवाई बुडाली आणि गोविंदराव पुण्याजवळच्या एक खेड्यात माळ्याचे काम करू लागले. शेतीतला भाजीपाला पुण्यात आणून विकू लागले. भाजीपाला विकण्यासाठी पुण्यात दुकान सुरू केले. तेथेच त्यांना १८२७ साली मुलगा झाला त्यांचेच नाव ज्योतिराव..

गोविंदराव ज्योतिरावांना 'ज्योती' म्हणूनच आवाज द्यायचे, याच ज्योतीचा लख्ख प्रकाश पुढे महाराष्ट्रभर पसरेल याची कल्पना कुणालाही नव्हती. ज्योतिराव फुले हे माळी समाजातील... अंगाने मजबूत. त्या काळात शिक्षण हे फक्त ब्राह्मणांपुरतेच मर्यादित... माळी समाजाला प्रवेश कसा मिळणार..? त्याकाळी खेड्यात प्राथमिक शिक्षण देण्याची सोय नव्हती... व्यवहारापुरते शिक्षण देण्याची व्यवस्था होती तेही तात्पुरतीच... १८१३ साली इंग्रजांचे शिक्षणविषयक धोरण सर्वत्र लागू झाले. या कायद्यामुळे पुढे सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. याचा फायदा घेऊन गोविंदरावांनी ज्योतिरावांना शाळेत प्रवेश



दिला. ज्योतिराव बुद्धीने कुशाग्र, अभ्यासात हुशार, यामुळे गोविंदरावांना वाटले की, ज्योतिराव आपल्या शिक्षणामध्ये पुढे आपले नाव करतील.. पण शेवटी ज्योतिरावांना शिक्षण पूर्ण करता आले नाही. त्यांना मध्येच शिक्षण सोडून शेताची कामे करावी लागली.

ज्योतिराव गोविंदराव फुले हे अत्यंत कुशाग्र, बुद्धिमान असल्यामुळे त्यांना नुसते काम करून राहणे शक्य झाले नाही. शेवटी इसवी सन १८४१ साली स्कॉटिश मिशन शाळेत त्यांनी आपले नाव दाखल केले... त्यावेळेस त्यांचे वय साधारणतः १४ वर्षाचे होते. तीन वर्षांचे त्यांचे शिक्षण थांबले होते. नियमित शालेय अभ्यासातून त्यांचा लक्ष उडाले होते तरीही त्यांनी कंटाळा न करता जिद्दीने अभ्यासाला सुरुवात केली आणि एक हुशार विद्यार्थी म्हणून ते शाळेतून पहिल्या क्रमांकाने पास झाले. त्यांच्यावर थॉमस पेन यांचा विचारांचा प्रभाव पडला. हिंदू धर्मातला अडसरपणा समजण्यास त्यांना वेळ लागला. हिंदू धर्मातील कर्मकांड, त्यांना दिले गेलेले आवाजवी महत्त्व, विशिष्ट वर्गातील माणसांनीच घेतलेला फायदा, माणसात केल्या जाणारा फरक, या सगळ्या गोष्टींची त्यांना

समजूत झाली. याच दरम्यान त्यांनी शिवाजी महाराज, वॉशिंग्टन, मार्टिन ल्युथर किंग, यांची चरित्र वाचले. यांच्या स्फूर्तीदायक चरित्रातून त्यांना प्रेरणा मिळाली. थॉमस पेन यांच्या विचाराने तर ते खूपच प्रभावित झाले. थॉमस पेन यांचा परमेश्वरावर दांडगा विश्वास होता. परमेश्वर हाच विश्वाचा निर्माता आहे. तोच एकमेव सूत्रधार आहे. त्याने जगातील स्त्री–पुरुषांना जन्मताच समान अधिकार दिले आहेत म्हणून माणसा माणसात देश, वंश, पंथ, दर्जा, लिंग यावरून भेदभाव करणे हे परमेश्वराला मान्य नाही. परमेश्वराचे स्मरण ठेवून मानव जातीच्या कल्याणासाठी झटणे हाच खरा धर्म आहे. थॉमस पेनच्या विचारांचे प्रमुख सूत्र आणि या सूत्राने ज्योतिराव पुढे प्रभावित झाले. महात्मा फुले यांनी पुण्यामध्ये इसवी सन १८४८ साली पहिली शाळा काढली त्यावेळी त्यांचे वय केवळ २१ वर्षांचे होते. एका भारतीयाने भारतातील मुलींसाठी सुरू केलेली ही पहिली शाळा होती. शाळेतल्या मुलींना स्वतः ज्योतिराव शिकू लागले. मुलींचा सहभाग फारच कमी होता. शिकविणारा शिक्षक पुरुष असल्यामुळे पालक मुलींना शाळेत पाठवायला तयार नव्हते. ही उणीव महात्मा ज्योतिरावांच्या लक्षात आली आणि त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाची संधीच त्यांच्यासाठी जणू काही चालून आली. त्यांची अडचण त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंनी पूर्ण केली. महापुरुष संकटांना घाबरत नसतात. ते आपल्यापुढे असलेल्या ध्येयापासूनही विचलित होत नसतात. ज्योतिरावांना आणि सावित्रीबाईंना प्रसंगी घर सोडावे लागले. त्यांना स्वतंत्र संसार थाटावा लागला. बांधकामाचा व्यवसाय त्यांनी मजुरांच्या सहाय्याने केला. नीतीने काम करून पैसा कमावला. दिवसभर काम करून रात्रीच्या वेळी ते मजुरांना शिकवत. त्यांच्या ध्यानीमनी एकच विचार होता तो म्हणजे सर्वांनी शिकले पाहिजे. जोवर शिक्षणाचा प्रसार होत नाही तोवर समाजाची प्रगती होणार नाही. केवळ शिक्षण नसल्यामुळे मूठभर लोकांनी समाजाला गुलामीच ठेवले हे त्यांनी ओळखले... 'विद्याविना मती गेली. मतीविना नीती गेली. नीतीविना गती गेली. गती विना वित्त गेले. वित्तविना शुद्र खचले... इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले,' असे महात्मा ज्योतिबा फुले म्हणत. महात्मा ज्योतिबा फुले हे कोणत्याही प्रश्नाचे उत्तर शोधताना मुळापर्यंत ते जात असत. आणि त्याचे कारण शोधून काढून त्यावर ते उपाय सुचवीत असत. प्रत्येक प्रश्नाची उकल करून त्याची नीट घडी बसवणारे हे लोकविलक्षण समाज सुधारक ज्योतिराव फुले होते... ते ठासून सांगायचे... तुम्ही असं करा, नक्कीच यश येईल ते खऱ्या अर्थाने कर्ते सुधारक होते. त्यांनी आपल्या स्वतःपासून प्रत्येक विचारांची सुरुवात केली आणि ती पूर्णत्वास नेली.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा विडा उचलला होता. बहुजन समाजाला जागे करणे हे त्यांच्या क्रांतिकार्याचे मुख्य सूत्र होते. सत्य, समता, मानवता आणि बंधुभाव यावर आधारलेला समाज त्यांना निर्माण करायचा होता. यासाठी या विचारांचे सहमत असणाऱ्यांची त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात बैठक घेतली. या बैठकीत सत्यशोधक समाजाची स्थापना करण्याचे ठरले. संस्थेच्या नावावरूनच संस्थेचा मुख्य हेतू स्पष्ट होतो. सत्याचा शोध घेणे या संस्थेचे मुख्य ध्येय आणि धोरण होते. या संस्थेचे पहिले अध्यक्ष म्हणून ज्योतिराव गोविंदराव फुले यांची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे कोषाध्यक्षाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. संस्थेच्या कार्यवाह पदी नारायणराव कडलक यांची नियुक्ती झाली. या संस्थेत सर्व जाती–जमातीच्या लोकांना सभासद होत आले. सभासद होण्यासाठी त्यांना प्रतिज्ञा घ्यावी लागत असे. संस्थेची प्रतिज्ञा अशी होती...

सर्व मानवप्राणी एकाच देवाची लेकरे आहेत. सबब, ती माझी भावंडे आहेत अशा बुद्धीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा भक्ती, अगर ध्यानधारणा करतेवेळी अगर धार्मिक विधीचे वेळी मी मध्यस्थीची गरज ठेवणार नाही. दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन. मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन. मी नेहमी राजनिष्ठेने वागेन. सत्यरूपी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल अशा प्रकारे आयुष्यक्रम गुजरण्यास योग्यप्रकारे तो मला मदत करो.... या प्रतिज्ञेवरून संस्थेची उद्दिष्टे

आपल्याला लक्षात घेता येईल.

सत्यशोधक समाजाच्या प्रचारार्थ ज्योतिरावांनी अनेक ठिकाणी सभा संमेलन घेतली. संस्थेची ध्येयधोरण स्पष्ट केली. थोडक्यात, सत्यशोधक समाजाचे जाळे सर्व महाराष्ट्रभर पसरले. विविध ठिकाणी संस्थेच्या शाखा उघडण्यात आल्या. पुणे येथील सोमवार पेठेत डॉ. गोवंडे यांच्या घरी दर सोमवारी सत्यशोधक समाज या संस्थेची बैठक सुरू झाली. यात दारूबंदी, शक्तीचे शिक्षण, ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून सुटका करणे, स्वदेशीला प्रोत्साहन देणे, लग्नासारखे विधी कमी खर्चात करण्याचा प्रयत्न करणे, परमेश्वर हाच सूत्रधार, माणसा माणसातला बंधुभाव अशा अनेक विषयांवर चर्चा होत असे. बैठकीत केवळ शाब्दिक चर्चा होत नसे तर या चर्चेतून जे काही ठरले आहेत त्या ठरलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी वेगवेगळे विषय ठरविण्यात येत असे, याचाही आराखडा ठरवला जात असे. संस्थेच्या वतीने गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी, गरीब मुलांकडून अर्ज मागवून घेतले जात. अत्यंत गरजू आणि दहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे. सत्यशोधक समाज या संस्थेने ब्राह्मणाशिवाय विवाह विधीची पद्धत घालून दिली. सत्यशोधक समाज पद्धतीचा पहिला विवाह सीताराम आल्हाट आणि राधाबाई ग्यानोबा निंबणकर यांचा २५ डिसेंबर १८७३ रोजी संपन्न झाला. तसेच ७ मे १८७४ रोजी ग्यानोबा संसारे (हडपसर) यांचा विवाह काशीबाई नारायण शिंदे यांच्या समवेत पार पडला. अशा रीतीने लग्न समारंभातील ब्राह्मणांची मक्तेदारी संपुष्टात आली. सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी तळमळीने कार्य करणारी सत्यशोधक समाज ही संस्था महाराष्ट्रभर रुजू झाली आणि ती अस्तित्वात आली.

सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ मानवविषयक संकल्पनेचे समग्र दर्शन घडवतो. हा ग्रंथ म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा एक जाहीरनामाच आहे. विश्वकुटुंबवादाची ती एक गाथाच म्हणावी लागेल. 'वसुधैवकुटुंबकम', धार्मिक सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा आणि मानवी समानता ही मूल्ये या ग्रंथाचा मूलाधार आणि प्रेरणा म्हणावी लागेल. मानव हीच सामाजिक मूल्यांची आणि समाज धारणेची मापकाठी असावी. हा विचार यात प्राणभूत आहे. मानवप्राणी एकंदर सर्व जगात कशाने सुखी होईल? या प्रश्नाचे सत्यवर्तन हे उत्तर देऊन महात्मा फुलेंनी प्रमाण देऊन सांगितले आहे. आणि हाच धागा डोळ्यासमोर ठेवून महात्मा फुलेंनी संपूर्ण महाराष्ट्रभर आपले शिक्षणविषयक विचार प्रभावीपणे निर्माण केले... शिक्षण हा जीवनाचा आधार आहे.. शिक्षणापासून आपण वेगळे आणखी काही करू शकत नाही...प्रत्येक व्यक्ती हा शिक्षण देणारा एक चालता बोलता ग्रंथ व्हावा... शिक्षण ही प्रत्येकाच्या जगण्याची गुरुकिल्ली व्हावीत म्हणजेच आयुष्य जगताना कसे जगावे आणि इतरांना शिक्षण देऊन त्याच्यातला अज्ञान आणि अधोपणा दूर कसा करावा हे महात्मा फुले यांनी त्यावेळी ओळखले. त्यांनी सर्व शिक्षण तज्ज्ञांची विचारवंतांची आणि समाज सुधारकांची जीवनी अभ्यासली... महात्मा फुले आणि त्यांचे शिक्षणविषयक विचार आजच्या सर्वत्र अभ्यासक्रमात प्रगट होणे गरजेचे आहेत... फुले हे खऱ्या अर्थाने मानवतावादी विचाराचे होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून संबोधले जायचे... त्यांनी मेक्यालेच्या शिक्षण व्यवस्थेला कडाडून विरोध केला. शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे या विचाराला फुलेंनी कडाडून विरोध केला.... कारण इंग्रजांचा भर हा प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे आणि नंतर खालचा वर्ग नाही शिकला तरी चालेल हा हेतू होता... अर्थात प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे...आधी कळस, मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस अशा पद्धतीने शिक्षण प्रणाली असे शिक्षण सर्वत्र व्हावे हा आग्रह महात्मा फुले यांचा होता... प्रथम उपेक्षितांना शिक्षण आणि नंतर अपेक्षितांना शिक्षण हे सूत्र त्यांनी आपल्या विचारातून प्रगट केले. स्त्री शिक्षणाचा त्यांनी पाठपुरावा केला. प्राथमिक शिक्षण शक्तीचे आणि मोफत व्हावे...प्रशिक्षित शिक्षकांची तरतूद करावी... आणि खऱ्या अर्थाने बाल शिक्षण, प्राथमिक शिक्षणाकडे सर्वांनी लक्ष द्यावे, ग्रामीण भागातील मुला मुलींचे शिक्षण, राष्ट्रनिर्मासाठी सर्व घटकातल्या लोकांचे शिक्षण... शिक्षण प्रणालीमध्ये अमूलाग्र परिवर्तन व्हावे.

व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणावर भर.. या सगळ्या गोष्टींचा विचार करत त्यांनी त्रिभाषा सूत्रांचे अवलंब केला. शिष्यवृत्ती आणि वस्तीगृहाची सुविधा हा त्यांचा मुख्य हेतू आणि कळकळीचा विषय होता. शिक्षणविषयक ज्ञान आणि विचार हा त्यांचा आग्रही बिंदू... स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा हा त्यांचा मूल्यबिंदू.... अशा सगळ्या गोष्टींचा विचार करत महात्मा फुले यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायम उघडली.. या व्यवस्थेत महात्मा फुले आणि स्त्री शिक्षण मोहीम सर्वप्रथम महाराष्ट्रात राबवली... शिक्षण हे सामर्थ्याचे प्रतीक आहे ते जगण्यासाठी प्रत्येकाला बळ देतं आणि या व्यवस्थेचा स्त्री हा महत्त्वाचा घटक आहे. स्त्रियांना शिक्षण देणे, तिला शिक्षित करणे आणि तिच्या त्या बुद्धिमत्तेच्या, क्षमतेचा विचार ओळखून महात्मा फुले यांनी पहिल्यांदा आपल्या पत्नीला सावित्रीबाई फुलेंना शिक्षित केले... प्राथमिक शिक्षण शक्तीचे आणि मोफत... प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा अधिकार आणि हक्क हा दृष्टिकोन महात्मा फुले यांनी ओळखून आपले विचार त्यांनी त्यावेळी मांडले. अनेक लोक शिकून मोठे होतात, परंतु हेच शिक्षण मोफत आणि शक्तीचे केले तर आपोआपच सर्वांची संख्या वाढेल आणि दर्जेदार शिक्षण आणि प्रशिक्षित शिक्षक समाजामध्ये निर्माण होईल अशी कळकळ महात्मा फुले त्यावेळी व्यक्त करायचे.... सर्व स्तरावरील शिक्षण हे उत्तम दर्जाचे असावे. सरकारी नोकऱ्यांमध्ये सर्व वरिष्ठ वर्गांची मक्तेदारी आहे हे महात्मा फुलेंना दिसल्यानंतर त्यांनी सर्वच तळागाळातील लोकांना शिक्षणासाठी आग्रह धरला. प्राथमिक शिक्षण खालच्या वर्गास देण्यावर त्यांनी अधिक भर दिला. उच्च शिक्षणाकडे कमी आणि ग्रामीण जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे हा त्यांचा मुख्य आग्रह होता. प्राथमिक शिक्षणातून पिढी ही खऱ्या अर्थाने घडते म्हणून आपल्या देशामध्ये आजची परिस्थिती लक्षात घेता आज शिकलेल्या अध्यापक आणि विद्यार्थी यांचा अनुभव जर आपण गोळा केला तर आपण त्या स्तरापर्यंत पोहोचतो की नाही हा प्रश्न पडतो... बहुजन समाज ग्रामीण भाग आणि तळागाळातील वर्ग यांचे शिक्षण सार्वत्रिकरीत्या व्हावे. हे राष्ट्रनिर्माणासाठी अत्यंत आवश्यक आहेत, असे मत महात्मा फुले यांचे होते. होतकरू मुलांसाठी शिष्यवृत्ती आणि वस्तीगृहाची सुविधा या छोट्या छोट्या गोष्टींवरसुद्धा त्यांनी भर दिला. शिक्षणविषयक ज्ञान आणि विचार...शिक्षण हा तिसरा डोळा आहे. त्यामुळेच महात्मा फुलेंनी या गोष्टीकडे जास्त लक्ष देऊन एका व्यक्तीची मक्तेदारी न बनवता सर्वांना शिक्षण मिळावे शिक्षणाचा प्रसार व्हावा ज्ञान आणि विचारांची वृद्धी व्हावी यावर महात्मा फुलेंनी भर दिला..

निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक

भांडणे अनेक कशासाठी..?

महात्मा ज्योतिबा फुले यांची धर्मासंबंधीची भूमिका या छोट्याशा अवतरणातून चांगल्या प्रकारे व्यक्त झाली आहे. सत्यशोधक समाजाची स्थापना मागील त्यांची एक प्रमुख प्रेरणा केवळ धर्म सुधारण्याची नसून आपल्या धर्माविषयी कल्पनेत अमूलाग्र बदल घडून आणण्याचे होती. महात्मा ज्योतिबा फुले हे एकेश्वरवादाचे पुरस्कार होते. ईश्वर एक आहे, मग अनेक धर्म कशासाठी...? यातून कलह निर्माण होतो, असे त्यांचे मत होते. सार्वजनिक सत्यधर्माचा पुरस्कार त्यांनी केला. सार्वजनिक शब्दांचा अर्थ सार्वत्रिक, देश कालातीत, म्हणजेच सर्व देशातील, काळातील आणि जमातीतील लोकांना सामावून घेणारा असा होतो. धर्मासंबंधीची त्याची मते ही संकुचित मुळीच नव्हती. आपल्या समाजात आणि खेड्यापाड्यात बहुदेववादाचे अतोनात प्रस्थ असल्यामुळे त्यात समाज भरडल्या जातो. त्यामुळे एकेश्वर वादाची शिकवण बहुजनांच्या धार्मिक जीवनात नव्या जाणिवा निर्माण करतील. त्यांच्यात एक पोषक तत्त्व निर्माण होईल. इतकेच नाही तर विशुद्ध धर्म भावनेला छेद देणाऱ्या संस्थात्मक धर्मातील बाह्य अवडंबरावर धर्मभोळेपणावर, अंधश्रद्धेवर, अन्याय अत्याचारावर आणि पर्यायाने पुरोहित शाहीवर महात्मा ज्योतिराव फुले यांनी जोरदार हल्ला चढविला. धर्म व्यक्तिपुरता मर्यादित पाहिजे असे त्यांचे मत होते. एक भाऊ हिंदू, दुसरा बौद्ध, तिसरा ख्रिस्ती, सारे एका कुटुंबात परमेश्वराच्या धर्म बुद्धीबद्दल आदर ठेवून खेळीमेळीने एकत्र राहू शकले पाहिजेत. हा त्यांचा अट्टहास होता. धार्मिक कलहाने आणि धार्मिक द्वेषाने

आपल्या देशातील वातावरण वारंवार कलुषित होते. अशा परिस्थितीत महात्मा ज्योतिराव फुले यांची ही शिकवण आपल्याला निरंतर आत्मसात करण्याची फार गरज आहे एवढे मात्र निश्चित.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेमागे त्यांची दुसरी प्रेरणा होती ती बहुजनांच्या उद्धाराची...लोकभावना लोकसेवा, लोक चळवळ ही ईश्वर सेवाभावी या भावनेने महात्मा ज्योतिराव फुले यांनी सार्वजनिक कार्यास प्रारंभ केला. केवळ आपल्या जातीचे आपल्या समाजाचे हित पाहणाऱ्यांची वृत्ती त्यांच्या मनात कधीच नव्हती. समाजातील उपेक्षित, दलित, पददलीत, गरीब, दीन–दुबळे अशा या सर्व गटांना वर आणले पाहिजे. या कळकळीतून त्यांनी मुलींची शाळा काढली. पुनर्विवाहाचा हट्ट धरला. बालहत्या प्रतिबंधक गृहस्थापन केले. एवढेच नव्हे तर त्यांनी स्पृश्य–अस्पृश्यांसाठी शाळा काढली. त्यांच्यासाठी आपल्या घरचा हौद खुला केला. समाजातील आणि समाज बांधवातील अन्य लोकांच्या बरोबरीने नात्याने प्रेमाने वागावे म्हणून त्यांनी आवर्जून प्रचार आणि प्रसार केला.

महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक कार्याच्या पूर्वकाळात त्यांची भूमिका प्रामुख्याने मानवतावादाची होती. शिक्षण आणि सेवा यांच्याद्वारे त्यांनी दलितांच्या कल्याणासाठी, स्त्रीमुक्तीसाठी प्रयत्न केले. नुसत्या शाळा काढून लोकांचे दैन्य हटणार नाही त्यासाठी धार्मिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरी नष्ट केली पाहिजे यावर त्यांनी भर दिला. पुरोहित, धर्मशास्त्रज्ञ, सरकारी अंमलदार आणि सावकार यांच्या स्वार्थी आणि जुलमी वृत्तीवर त्यांनी प्रखर हल्ला केला. या सर्व सत्ता स्थानांवर साधारणता मोठ्या प्रमाणात ब्राह्मण असल्याने हा हल्ला ब्राह्मणांवर दिसला तरी त्याचा खरा रोख वरिष्ठ जातींच्या अन्यायमूलक वर्चस्वावर होता. महात्मा फुले यांना सामाजिक जीवनातील जी काही कठोर वास्तवाची, सामाजिक गुलामगिरीची, नित्याच्या व्यवहाराची आणि व्यवहारातल्या अन्यायाची, विषमतेची तीव्रतेने जाणीव झाली. बहुजन समाजाच्या हालाखीच्या स्थितीचा विचार त्यांनी वारंवार केल्याचे आपल्याला दिसते. या हलाखीचे मूळ आपल्या समाज व्यवस्थेत, धर्म संस्थेत आहे असे त्यांना कळून आले होते. समाज एकात्म नाही. तो दुभंगलेला आहे. तेव्हा समाजाचे हित म्हणजे कोणते हित असा सवाल त्यांनी लोकांपुढे टाकला. ब्राह्मण आणि शूद्र, सावकार आणि शेतकरी यांचे हित एक आहे असे म्हणता येत नाही. आपला एकंदर सामाजिक रचनाच शोषक आणि शोषित, उच्चवर्णीय आणि शूद्रातिशूद्र यांच्यातील आंतर्विरोधावर आधारलेला आहे. हे त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या मनावर ठसविण्याचे प्रयत्न केले.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाज यातलं मर्म आपण जाणून घेतलं पाहिजे. महात्मा फुले यांनी समतेची, ममतेची जोड देऊन सार्वजनिक सत्यधर्म स्थापन केला. एकेश्वरवादी भूमिका मांडली. तेव्हा त्यांना संत तुकाराम दिसले..

विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म।भेदाभेद धर्म,अमंगळ।

ऐकाजी तुम्ही भक्त भागवत, कराल ते हित सत्य करा ।।

कुणाही जीवाचा न घडो मत्सर, वर्म सर्वेश्वर पूजनाचे।

तुका म्हणे एका देहाची अवयव, सुखदुःख जीव भोगवावे।।

हा अभंग म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले यांनी पूर्णपणे आचरणात आणलेला विचार. यातूनच त्यांनी आपली चळवळ निर्माण केली. पाश्चात्य विचारसरणीतून उदारमतवाद आपल्याकडे आला ते त्यांनी पचविला आणि लक्षातही घेतला. परंतु पाश्चात्य उदारमतवादातील भारतीयत्व त्यांनी प्रथम लक्षात घेतले. स्वातंत्र्य, समता, बंधुता याबरोबरच ममतेचा भाग त्यांनी लक्षात घेतला. भारतीय परंपरेचे जतन त्यांनी यातून कसं करता येईल हेही सांगितले. भारतातील प्रकृती आणि संस्कृती याचे महत्त्व लक्षात घेऊन पश्चिमात्य विकृती काढण्याचे काम महात्मा ज्योतिबांनी प्रथम केले. चळवळ ही बुद्धी तत्त्वावर आधारलेली असते याला त्यांनी सर्वाधिक महत्त्व दिले. परंपरेनुसार शब्दप्रामाण्यवादावर भर न देता त्यांनी बुद्धीप्रामाण्यावादावर भर दिला.

सत्य असत्यासी मन केले ग्वाही ।

मानि ले नाही बहुजना ।।

तुकारामाने म्हटले तेच ज्योतिबांच्या ध्यानात आले. एकेश्वर वादाची भूमिका ही त्यांनी समरस्तेतून, ममतेतून, बंधुभावनेतून मांडली. त्यांनी यासाठी बायबल आणि कुराणातील ही उदाहरणे दिलेली आहेत. अपेक्षित ईश्वर हा समाजाशी निगडित ठेवायचा असेल तर रंजलेल्या गांजलेल्यांची मदत करणारा ईश्वर आणि मानव त्यांना पाहायचा आहे. महात्मा ज्योतिराव फुले हे कर्ते सुधारक असले तरी त्यांचे कर्तेपण त्यांनी आपल्यापुरते मर्यादित ठेवलेले नाही. मध्यमवर्ग किंवा एका विशिष्ट जातीपुरता विचार त्यांना अभिप्रेत नव्हता, तर संपूर्ण मानव जात त्यांना अपेक्षित होती. जाती मधल्या मानवाला त्यांनी एकत्रित आणले.

महात्मा फुले यांनी ईश्वरासाठी 'निर्मिक' हा शब्द वापरला. 'निर्मिक' म्हणजे निर्माण करता... ईश्वर ही कल्पना कर्मठपणाशी निगडित असणारी आहे. ज्योतिबा हे मूर्तीपूजक होते आणि मूर्तीभंजकही होते. त्यांना जुनं नष्ट करायचं होतं. जुने विचार नष्ट करायचे होते. मूर्ती भंजकाच्या डोक्यात नवीन मूर्ती निर्माण करण्याचं सामर्थ्य असावे लागतात ते त्यांच्यात होते. ज्योतिबांनी धर्माच्या भूमिकेतून स्त्रियांकडे पाहण्याची एक विशिष्ट धारणा निर्माण केली. स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणून त्यांना आपण ओळखतो. भारतीय इतिहासातील महात्मा फुले हे असे एकमेव व्यक्तिमत्त्व आहे ज्यांच्या चळवळीवर पुढच्या इतर सर्व चळवळी केंद्रिभूत झाल्या. त्यामुळे केवळ स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्त्रीमुक्ती या दृष्टीने त्यांच्या चळवळीकडे न पाहता त्यांच्या परंपरेची, नवतेची, विचारांची वाटचाल आपण प्रत्येकाने स्वीकारावी हे मात्र निश्चित.

महात्मा ज्योतिबा फुले यांचा जेव्हा गौरव करण्यात आला तेव्हा त्यांना समाजाच्या नेत्यांनी महात्मा ही पदवी बहाल केली. त्यावेळेस महात्मा ज्योतिराव फुले म्हणाले....

मी सत्याचा शोध घेतला. ते सत्य म्हणजे सर्वांचा निर्मिती एकच आहे. आपण सर्व त्या एकाच निर्मिकाची लेकरे आहोत. या सत्याचा मी पाठपुरावा केला. माझ्या शूद्रातिशूद्र बांधवांना माणुसकीचे हक्क मिळावेत म्हणून उच्चवर्णीयांसोबत झगडा केला. माझा झगडा कोणत्याही जातीविरुद्ध, व्यक्तीविरुद्ध नाही आहे. माझा झगडा माणसा माणसात भेदभाव करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध आहे. माझ्या कनिष्ठ आणि शूद्रातिशुद्र बांधवांच्या बाबतीत मी जे काही केले आहे ते माझे कर्तव्यच होते. विद्या संपादन हाच आपल्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग आहे. तुम्ही मला आज महात्मा पदवी देऊन जो माझा गौरव केला तो म्हणजे खरा तुमचाच गौरव आहे. मला माझ्या कामात ज्यांनी सहाय्य केले त्यांचाच हा आजचा सत्कार आहे. तुम्ही माझा सर्वांनी सत्कार केला माझ्यावरती प्रेम आणि विश्वास व्यक्त केलात मी आपला ऋणी राहील. असा हा महात्मा....लोकांनी गौरविला... सर्वांच्या आदरास पात्र ठरला.





काय वानू या संतांचे उपकार!

संत कवयित्रींना मिळालेल्या या समानतेतूनच चोखामेळ्यांची पत्नी सोयराबाई यांनी भक्तिमार्गावर आणखी एक उल्लेखनीय पाऊल टाकलं, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. 'देहासी विटाळ म्हणती सकळ। आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध।।' या शब्दांत गावकुसाबाहेरचं अपमानित जिणं सोयराबाई हलकं करून टाकतात. शरीर आणि आत्मा यांच्यामधलं अंतर सांगताना हिंदू धर्मातलं फार मोठं तत्त्वज्ञान त्या मांडतात. जिला गाभाऱ्यातल्या विठ्ठलाचं दर्शन कधीही मिळू शकलं नाही, ती म्हणते - पाहते पाहणे गेले दुरी म्हणे चोखियाची महारी! डोळ्याला जे दिसतंय, त्याच्या पल्ल्याड बघण्याची दृष्टी केवळ भक्तीतलीच ताकद देऊ शकते.

आसावरी देशपांडे जोशी

७०५७५५७५०८

आजच्या नवयुगात चॅट जीपीटी आणि गुगल जेमिनी हे दोन भरभक्कम गुरू ज्ञानपिपासूंना ज्ञान मुक्तहस्ताने वाटत आहेत. कधीही, कुठेही, कसलेही प्रश्न विचारा, उत्तर क्षणांत हजर! अलीकडे भक्तीमार्गही असाच गजबजलेला दिसून येतो. सांसारिक अडचण असो की पारमार्थिक, विवाहयोग असो की पुत्रयोग, आर्थिक स्थैर्य असो की मानसिक अस्वास्थ्य असो, यातल्या प्रत्येक समस्येच्या निराकरणाचा मंत्र देणारे गुरू आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात असतात. गुरुविण कोण दाखविल वाट, हे अगदी खरं आहे. आपण फार सामान्य वकुबाची माणसं असतो. आपल्या आयुष्याचा गाडा ओढत असताना सतत कुणावर तरी भावनिकदृष्ट्या अवलंबून राहाणं, ही बहुसंख्यांची गरज असते. सवय असते, असंही म्हणायला हरकत नाही. बदलत्या काळातल्या बदलत्या आव्हानांना सामोरं जात असताना कुणाचं तरी बोट अदृश्यपणे आपल्या हाती असावं, असं प्रत्येकाला वाटत असतं. परमेश्वरावर नितांत श्रद्धा असली, तरी परमेश्वरप्राप्ती ही सामान्यांची मिरास नक्कीच नव्हे. मग अशा वेळी, ज्यांच्या शब्दांना पावित्र्याचा गंध येतो, अशा सत्पुरुषांचं समाजातलं महत्त्व वाढीला लागतं. भक्तीच्या या वाहत्या गंगेत हात धुऊन घेणारे स्वयंघोषित गुरूसुद्धा उदंड असतात. समाजात बुवाबाजीचं प्रस्थ वाढवण्यात त्यांचा फार मोठा हातभार असतो.

खरं तर, सध्याच्या आधुनिक शिक्षणपद्धतीमध्ये

'ध्रुव दोन्ही आले जवळी' हे मुलांच्या मनावर बिंबवलं जातं. ते योग्यच आहे, पण या आधुनिकीकरणामध्ये आपला इतिहास, आपल्या पूर्वजांचे जगण्याचे आदर्श बालमनापर्यंत पोहोचतच नाहीत. जुन्या संदर्भांना नव्याची जोड देऊन, काही प्रथा परंपरा काळाच्या कसोटीवर घासून मुलांना दाखवल्या पाहिजेत. आणि हे काम प्रामुख्याने धर्माचार्यांनीच केलं पाहिजे.

आम्हां न कळे ज्ञान, न कळे पुराण
वेदांचे वचन न कळे आम्हां ।।

असं संत चोखामेळा यांनी म्हटलं असलं, तरी आद्य शंकराचार्यांनी मांडलेलं अद्वैत तत्त्वज्ञान या संतपरंपरेला खऱ्या अर्थाने पूर्णपणे आकळलं आहे आणि म्हणूनच, समाजाला भक्तीमार्गावर नेणारा भागवत धर्म हा सर्वात मोठा गुरू आहे, असं म्हणावंसं वाटतं. या संप्रदायाचा विचार केला तर लक्षात येतं, एक तो पांडुरंग आहे सगळ्यांना एकत्र घेऊन जाणारा! काळ्या पाषाणातली विटेवर उभी असलेली ती अचल मूर्ती! मोठमोठी प्रवचनं देत नाही तो, कसल्या कसल्या पूजाही सांगत नाही. वारकऱ्यांच्या दाटीत उभा असतो शांतपणे! ती रुक्मिणी? ती तर नसतेच वामांगी; दूर तिकडे दुसऱ्याच मंदिरात उभी असते. ज्याच्या ओढीने गेली कित्येक दशकं हजारो, लाखो वारकरी पंढरपूरला येतात, त्याची पत्नी म्हणून जराही मिरवत नाही ती! आज भक्तांना सपत्निक दर्शन देणाऱ्या पारमार्थिक गुरूंच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल–रुक्मिणीचं हे वेगळेपण किती उठून दिसतं.

आजच्या जेन झी पिढीला स्पृश्य–अस्पृश्य हा भेद कळणार नाही, आज समाज त्यापलीकडे गेलाय. पण एक काळ असा होता, जेव्हा समाजव्यवस्थेवर सवर्णांचं प्राबल्य होतं. मंदिर प्रवेश ही सहज गोष्ट नव्हती तेव्हा. अठरापगड जातीतले कितीतरी भक्त महाद्वारातल्या पायरीवरूनच पांडुरंगाचं दर्शन घेत असत. नामदेवांच्या घरी राहणारी जनी पांडुरंगाच्या गाभाऱ्यात जाऊ शकली नाही. पण अशी बंधनं सोसूनही चोखामेळा म्हणतात –

'कोण तो सोवळा, कोण तो ओवळा
दोहींच्या वेगळा विठ्ठल माझा ।।
पाचांचा विटाळ एकाचिये आंगा
सोवळा तो जगामाजी कोण ।।'

अशिक्षित चोखोबांचं आयुष्य उजळवून टाकणारा हा ज्ञानाचा उजेड कुठून येतो? आईवडिलांच्या पश्चात् ज्ञानी भावांच्या छायेत वाढणाऱ्या ८/१० वर्षांच्या चिमुकल्या मुक्ताबाईला ताटीचे अभंग कसे सुचतात? योगी पावन मनाचा हे शहाणपण कोण शिकवतं तिला? जनीच्या केसांतल्या उवा काढणारा पांडुरंग तुळशीच्या बनात तिला न्हाऊ घालतो, तिची वेणी घालतो. आणि मग 'जनी सांगे सर्व लोकां न्हाऊ घाली माझा सखा' अशी अभिमानोक्ती जनाबाई करते. कुठून येतो हा विश्वास? वारकरी संप्रदायामध्ये अशा अचंबित करणाऱ्या अनेक गोष्टी आपल्याला दिसून येतात. समाजाला भक्तीची दिशा दाखवतानाच सामाजिक समरसतेचा पाया वारकरी संप्रदायाने रचला. पंढरपूरला जाऊन येणारा प्रत्येक माणूस हा जणू प्रत्यक्ष पांडुरंगच आहे असं समजून निर्मळ चित्ताने 'वर्ण अभिमान विसरली याती, एकमेकां लोटांगणीं जाती' हा पायंडा वारकरी संप्रदायाने पाडला. गुरुमुखी विद्या हे कितीही खरं असलं, तरी कितीतरी अशिक्षित, अडाणी माणसं केवळ एका पांडुरंगावर विश्वास ठेवून वर्षानुवर्षं वारीला जातात. खरं तर वारीतून नेमकं काय मिळालं, हेसुद्धा कित्येकांना शब्दांत सांगता येणार नाही. नव्हे, कित्येकांना ते कळलेलंच नसतं. आणि तरीही कळसाचं दर्शन घेऊन माघारी येणारा प्रत्येक वारकरी आनंदाने ओसंडून वाहत असतो. पुन्हा नव्याने सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी तयार होतो. भावनिकदृष्ट्या कुणावर तरी विसंबून राहणारा आपला समाज एका पाषाणमूर्तीच्या दर्शनाने भक्तिमार्गावर स्थिरावतो.

स्त्री–पुरुष समानता हा एक अत्यंत महत्त्वाचा विचार संतपरंपरेने केवळ मांडला नाही, तो प्रत्यक्ष आचरणात आणून दाखवला. संत कवयित्रींमध्ये जनाबाई, बहिणाबाई, सोयराबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा, अशी महत्त्वाची नावं आपल्याला पटकन आठवतात. या स्त्रियांना स्वतःचे अनुभव काव्यबद्ध करण्याचं स्वातंत्र्य वारकरी संप्रदायाने दिलं. त्यांच्या रचनांचा सन्मानाने स्वीकार केला. म्हणून तर, जनाबाई त्यांच्या अभंगांच्या शेवटी मोकळेपणाने 'नामयाची जनी' असा स्वतःचा उल्लेख करतात. खरं

तर, नामदेवांच्या चौदा माणसांच्या घरात जनाबाई दासी म्हणून पंधरावी व्यक्ती झाली. आत्यंतिक भक्तिभावामुळे पांडुरंग तिचा सखा झाला, रात्रीच्या वेळी तिच्या सुखशेजेवर तिच्याशी



गुजगोष्टी करण्यासाठी पांडुरंग पहुडतो. तिच्या आंघोळीच्या कढत पाण्यात विठू विसण घालतो आणि हे मनोमन घेतलेले सगळे अनुभव जनी धिटाईने अभंगातून व्यक्त करते. तिचं सख्य पांडुरंगाशी आहे, तसं ते नामदेवांशीसुद्धा आहे. म्हणून तर 'नामयाची जनी' म्हणताना तिला समाजमनाचा धाक वाटत नाही. नामदेव आणि तिच्यातलं निर्मळ मैत्र मिरवण्याची ही हिंमत दिली केवळ वारकरी संप्रदायाने! पुढे समर्थांनीही वेणाबाईंना अशीच ताकद दिली आणि त्या वेणास्वामी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या, मिरजेच्या मठाचं अधिपत्य सांभाळू लागल्या.

संत कवयित्रींना मिळालेल्या या समानतेतूनच चोखामेळ्यांची पत्नी सोयराबाई यांनी भक्तिमार्गावर आणखी एक उल्लेखनीय पाऊल टाकलं, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. 'देहासी विटाळ म्हणती सकळ। आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध।।' या शब्दांत गावकुसाबाहेरचं अपमानित जिणं सोयराबाई हलकं करून टाकतात. शरीर आणि आत्मा यांच्यामधलं अंतर सांगताना हिंदू धर्मातलं फार मोठं तत्त्वज्ञान त्या मांडतात. जिला गाभाऱ्यातल्या विठ्ठलाचं दर्शन कधीही मिळू शकलं नाही, ती म्हणते – पाहते पाहणे गेले दुरी म्हणे चोखियाची महारी! डोळ्याला जे दिसतंय, त्याच्या पल्ल्याड बघण्याची दृष्टी केवळ भक्तीतलीच ताकद देऊ शकते. पण त्याहीपेक्षा उल्लेखनीय आहे, की सोयराबाई शेवटच्या प्रत्येक ओळीत स्वतःला 'चोखियाची महारी' असं म्हणवून घेतात. इथे मला दोन मुद्दे अत्यंत महत्त्वाचे वाटतात. पहिलं म्हणजे, पतीपत्नीमधलं अद्वैत! हजारो वर्षं स्त्रियांवर अत्याचार झालेच की! प्रत्येक पिढीतल्या एखादीला तरी स्वतःपुरता



का होईना, स्त्रीमुक्तीचा नारा द्यावासा वाटलाच असेल ना. स्वतःचं असं स्वतंत्र अस्तित्व असावं, हे वाटणं गैर थोडंच आहे? पण इथे मात्र, सोयराबाईंना स्वतःच्या नावाचासुद्धा उल्लेख करायचा मोह होत नाही. उलट, त्या मोठ्या अभिमानाने 'चोखियाची महारी' असा उल्लेख करतात. अहंभावनेचा लोप होणं, हीच आध्यात्मिक उन्नतची पहिली महत्त्वाची पायरी असते ना! यातला दुसरा शब्द तर भक्तीमधल्या 'सोऽहम्' या भावनेची चरमसीमा आहे, असं मला वाटतं. ज्या काळात जातीभेद विखारी पद्धतीने समाजात पसरलेला होता, त्याच्याच मुळे चोखोबांनी कित्येकदा बडव्यांचा मार सहन केला, ती जात मिरवण्याचं धारिष्ट्य सोयराबाई दाखवतात! एका बाजूला हे धारिष्ट्य नक्की वाटतं, तर दुसरीकडे त्यातला निरागसपणे केलेला आयुष्याचा स्वीकार आपल्याला जाणवतो. आणि त्याहीपुढे जाऊन विचार केला तर लक्षात येतं, त्यांनी मांडलेलं परमेश्वराबरोबरचं अद्वैत! तसंही, इतक्या हीन जातीमध्ये जन्माला आल्यावर प्रत्यक्ष पांडुरंगाची गळाभेट होणं अशक्यच होतं, हे ठाऊक होतं की सोयराबाईंना. पण भक्तीची खरी ताकद त्यांनी पणाला लावली आणि केवळ मनोबलावर परमेश्वरप्राप्ती करून घेतली. आणि मग एकदा का ते सावळं परब्रह्म भेटलं, की मग स्वतःची जातच काय, नावाचाही विसर पडतो! विठ्ठलभेटीमध्ये जी जात अडसर ठरत होती, तीच त्याच्या भेटीनंतर निरर्थक वाटावी, अवघा रंग एक होऊन श्रीरंग रंगी रंगावा, यापेक्षा भक्तीची ताकद आणखी काय असायची!

एक मात्र नक्की, या सगळ्याच संतमंडळींची पुण्याई थोर! यांना विठ्ठल प्रत्यक्ष भेटला, अनुभवता आला! यांची त्याच्यावरची श्रद्धा एवढी पराकोटीची, की चराचरांत भरलेला विविध रूपांतला विठ्ठल त्यांना गवसला, तो ओळखता आला. मग हिरवाईने डोलणाऱ्या शिवारात विठू

दिसला, लाकडं तोडताना कुऱ्हाड हलकी करणारा विठ्ठल शेजारी उभा दिसला. कधी रात्रीच्या अंधारात त्याने दर्शन दिलं, तुकोबांची गाथा जनसागरातून तारून नेली. 'पंढरीचे भूत मोठे आल्यागेल्या झडपी वाटे' असं तुकाराम महाराज म्हणून तर म्हणतात! संसारात राहूनही पंढरपूरची लौकिक आणि अलौकिक वाट चालायला वारकरी संप्रदायामध्ये मुभा आहे. सर्वसंगपरित्याग या संप्रदायाने अपेक्षिलेलाच नाही. कर्मकांडाचा कसलाही बडेजाव नाही, अर्थ समजायला अवघड असे मंत्रतंत्र नाहीत, 'रामकृष्ण हरी, पांडुरंग हरी' एवढा सोपा गजरसुद्धा या मार्गावर दिशादर्शक ठरतो. विठ्ठल हाच गुरू, विठ्ठल हाच मार्ग आणि विठ्ठल हाच मंत्र!

अध्यात्म ही संकल्पना तुमच्यामाझ्यासारख्या सर्वसामान्य माणसांसाठी थोडी दुष्करच वाटते. आपल्यासारख्यांना कर्माचा सिद्धांत नीटसा कळतोच असं नाही. ध्यानमग्न होऊन काही क्षणांसाठी का होईना, या मोहमायेपासून मुक्त होणं आपल्याला जमणारं नाही. तेवढी आपली आध्यात्मिक बैठक नाही. पण विठ्ठल एक महामंत्र आहे आपल्यासाठी! अनेक संप्रदाय आहेत, त्यांचे अनेक अनुयायी आहेत. विठ्ठल मात्र सर्वव्यापी आहे, सर्वसाक्षी आहे! दीनदुबळ्यांना उराशी धरणारा सखा आहे, मानवतेचा संगम आहे! 'जो जो जयाचा घेतला गुण तो तो म्यां गुरू केला जाण। गुरुसि आले अपारपण जग संपूर्ण गुरू दिसे' असं म्हणणारे एकनाथ महाराज संतविचारांना दिव्यत्वाची झळाळी देतात. 'जेथे जातो तेथे माझी भावंडे आहेत, सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत' असं म्हणणारे केशवसुत विश्वबंधुत्वाची भलावण करतात. तर, 'मुक्त आम्ही फक्त मानू बंधुतेच्या बंधना' असं म्हणणारे वसंत बापट मानवतेची पूजा बांधतात. हीच, अगदी हीच भावना व्यापक पटलावर वारकरी संप्रदायाने फार पूर्वीपासून आचरणात आणली आहे.

सध्याचा काळ सर्वच स्तरांवर स्थित्यंतराचा आहे. आपल्या पिढीपर्यंत घरी आईवडिलांनी, आजीआजोबांनी सांगितलेल्या गोष्टींवर भाबडेपणाने विश्वास ठेवला गेला; आता काळ बदलला आहे. मुलांना प्रत्येक गोष्ट सप्रमाण सिद्ध करून सांगावी लागते, तरच ती विश्वास ठेवतात. जातपात, पंथ, धर्म, देश अशा सगळ्या सीमा लंघून संपूर्ण जग जेव्हा 'ग्लोबल व्हिलेज' मानलं जातं, तेव्हा मुलं केवळ भाबडेपणाने संतपरंपरा स्वीकारणार नाहीत. आजवरची जीवनमूल्यं काळाच्या कसोटीवर घासून, त्यांची कालातीतता मुलांना पटवून देण्याची आता गरज आहे. पुन्हा एकदा संतकथा, त्यांचे अनुभव आजच्या संदर्भांशी जोडून मुलांना सांगायला हवे आहेत. गतानुगतिकतेने दरवर्षी वारी करतानाच आपल्यानंतरची पिढी याकडे नव्या दृष्टीने कशी बघेल आणि अधिक व्यापक अर्थाने कशी सहभागी होईल, याचे प्रयत्न डोळसपणे करणं, हीच आजची खरी गरज आहे!





अनोख्या कथन आविष्काराची कविता : 'नामशेष झालेल्या गोष्टी'

पांडुरंग सुतार यांच्या कवितांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे समाजव्यवस्थेने दिलेल्या सुतारकामाविषयी कवीने कधीही हीनतेची भावना किंवा तिरस्कार बाळगला नाही. उलट, लाकडाला तासून शेतीची अवजारे आणि घरे बनवणाऱ्या आपल्या पूर्वजांना ते देवदूत मानतात, ज्यांनी मानवी संस्कृतीची उत्क्रांती सुसह्य केली. गरिबी असूनही त्यांनी कधी देवाकडे तक्रार केली नाही, की मजुरीचा कुणाकडे तगादा लावला नाही. दादांचे आम्हा भावंडांवर असलेले प्रेम त्यांच्या रागावण्याइतकेच किंवा सुतारकाम करताना अंगातून निघणाऱ्या घामाएवढे आणि रात्री अंथरुणावर पडल्यावर कंबरेतून निघणाऱ्या ठणकेएवढे सार्थ होते. जुन्या लाकडाच्या देव्हाऱ्यात बसलेले देव कवीला कधी ओळखता आले नाहीत, पण दादांची ही निरपेक्ष आणि संवेदनशील वृत्ती कवीच्या अंतःकरणात खोलवर रुजून बसली आहे.

अरुण ठोके

९१७५१६४७९९

खान्देशातील पाचोरा येथील कवी पांडुरंग सुतार यांचे आजवर चार कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. पहिला संग्रह १९९५ मध्ये 'कपाळावर कोरलेले कवितेचे जखमी सूर्य', दुसरा २०१७ मध्ये 'दगडी खांबांचे आकाश', तिसरा २०२३ मध्ये 'ते कोण लोक आहेत' आणि एप्रिल २०२६ मध्ये 'नामशेष झालेल्या गोष्टी' हा चौथा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे. मी वर्णमुद्राच्या मे-जून २०२३ च्या अंकात 'ते कोण लोक आहेत' 'सत्याच्या रेघेची: वेदनावाहिनी कविता!' असा निबंध तिसऱ्या कवितासंग्रहावर लिहिला होता.

तिसऱ्या आणि चौथ्या कवितासंग्रहातील कविता वाचताना आपण मराठीतील सशक्त कविता वाचत असल्याचा अनुभव येतो. पांडुरंग सुतार यांची काव्याभिव्यक्ती उत्तरोत्तर बहरत आहे.

मराठीत मुक्तछंदातून मानवी जीवनाचे समकालीन पदर उलगडणारी कविता सातत्याने लिहिली जात आहे. ज्येष्ठ कवी पांडुरंग सुतार यांचा 'नामशेष झालेल्या गोष्टी' हा चौथा कवितासंग्रह याच समृद्ध परंपरेचा एक महत्त्वाचा आणि मोलाचा टप्पा आहे. हा संग्रह केवळ स्मृतींचा कोलाज किंवा प्रचलित अर्थाने चरित्रकाव्य ठरत नाही, तर यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आलेल्या कवीच्या चरित्रवजा प्रसंगांना कथनाच्या अनोख्या आविष्काराने एका वैश्विक पातळीवर नेऊन ठेवले आहे. कवी पांडुरंग

सुतार जितके चिंतनशील आहेत, तितकेच गोष्टीवेल्हाळ आहेत आणि जितके संवेदनशील आहेत, तितकेच तटस्थपणे जीवनाकडे पाहणारे तत्त्ववेत्तेही आहेत, असे या कवितेतील तत्त्वचिंतनाच्या आधारे म्हणता येते. त्यांच्या कवितेत सुखाची असोशी आणि दुःखाचे गूढ उकलण्याचा आत्माविष्कार सारख्याच उत्कटतेने आलेला आहे.

कवितागत 'मी'ला असलेली नात्यांची ओढ या कवितेत गोष्टी रचायला कारणीभूत होते. हृदयस्थ नाते असलेल्या आई व दादांची गोष्ट जशी यात आहे तसेच काकांची आहे. केसर आजी, धोंडू म्हातारा, बुध्दाची, मीनाक्षी मंदिर व तेथील लोकांची, केसुबाबाची, शरबत गुला, हिरामणच्या गायीची, हरवलेल्या घराची, गोबरुबाबाची, आई वारलेल्या पारूची, शहराची, वसतीगृहातील विधवा स्त्रीची, दुपारी पुस्तक वाचणाऱ्या मुलीची, बालपणी संग्रहित केलेल्या वस्तूंच्या खजिन्याची गोष्ट, वयस्कर झालेल्या आईची, कुमार अम्बुजची, १९७२ च्या दुष्काळाची, बाजारात खरेदी केलेल्या लाल टोमॅटोंची, मांडोळी फिरवायची राहून गेलेल्या मित्राची गोष्ट, पोस्टमनची गोष्ट, पदर पेटून भाजून मेलेल्या मनीची गोष्ट, सुरेख बासरी वाजवणाऱ्या अन्वरची गोष्ट, घर बांधण्याची गोष्ट, नारायण सुर्वे यांच्या भेटीची गोष्ट, मित्राचा पेन चोरल्याची गोष्ट, याशिवाय झाडांच्या गोष्टी आणि कवी आणि कवितेच्या गोष्टी तसेच जगभरातील नामांकित साहित्य कृतीतील पात्रांच्या प्रभावाच्या गोष्टी अशा अनेक गोष्टींचे तत्त्वचिंतन या कवितेतील कथनाला समृद्ध करणारे आहे. हे तत्त्वचिंतन कवितागत 'मी'च्या संवेदनशील, समंजस व अपरिग्रह वृत्ती स्वीकारल्याचे निदर्शन करणारे आहे. या तत्त्वचिंतनात बुद्धाची अपार करुणा जशी आहे तशीच महावीरांनी सांगितलेल्या स्यादवादाचीही झलक आहे. वारकरी संप्रदायातून मिळालेली, चराचरात असलेल्या ईश्वरी अंशांची जाणीवही ओतप्रोत आहे.

आदिम काळापासून मानवी मन कशाच्या पाठीमागे धावते, याचा विचार केला तर आपल्याला जाणवते की, माणसाला प्रत्येक गोष्ट 'जास्त' प्रमाणात हवी असते. सुख, आनंद, आयुष्य आणि प्रेम या सर्वांची मानवाला तीव्र लालसा असते; मात्र दुःखाचा छोटासा अनुभवही त्याला नको असतो. काळाच्या अथांग आणि अनंत असण्याच्या पार्श्वभूमीवर मानवी आयुष्य अत्यंत नगण्य आणि थोडे आहे, या सत्याची जाणीव कवीला आहे. परंतु, माणूस हे मिळालेले थोडे आयुष्यही राग, द्वेष आणि नको असलेल्या गोष्टींत स्वतःला गुंतवून, इतरांना दुखावण्यात घालवून बसतो आणि हे त्याचे त्यालाच कळत नाही, या विसंगतीवर कवी नेमके बोट ठेवतो. ही जाणीव माणसाला नैराश्याकडे नेणारी नसून अंतर्मुख करणारी आहे. कवी या अल्प आयुष्यात दुःखाला विद्ध करणारी नकारात्मक शक्ती मानत नाही, तर ते आयुष्य टवटवीत करणारे एक माध्यम मानतो. त्याच्या मते, गवतावर ओथंबलेल्या दवबिंदूएवढे, प्राजक्ताच्या कळीएवढे किंवा चिमणीच्या चोचीत मावणाऱ्या दाण्याएवढे थोडे जरी प्रेम मिळाले, तरी माणसाला दुःखाची खरी ओळख पटते. ही ओळख मानवी मनावर चढलेली स्वार्थाची आणि अहंकाराची नको असलेली पुटे धुऊन टाकते, अगदी एखाद्या पाऊससरीप्रमाणे; जी झाडांच्या पानांवरील धूळ आणि जळमटे धुऊन टाकते आणि नंतर झाडे जशी हिरवीगार, सुंदर दिसू लागतात, तसाच माणूसही टवटवीत होऊन जातो. दुःख सोसताना कुणाचीही सोबत नको असणारा हा कवी जेव्हा कुणाच्या मायेची फुंकर अनुभवतो, तेव्हा तो विश्वाला कवेत घेणारी परतफेड करतो. इथे बुद्धाची अपार करुणा, महावीरांचा स्यादवाद आणि वारकरी संप्रदायातून मिळालेली चराचरातील ईश्वरी अंशाची जाणीव स्पष्टपणे ओतप्रोत भरलेली दिसते. कवी शब्दांच्या ओंजळीतून दुःख शोषून घेतो; नदीचे पाणी भरताना जसे काही थेंब झरून जातात, तसेच काही शब्द अंतःकरणाच्या ओंजळीतून निसटतात, पण बोटांना चिकटून असलेली शब्दांच्या दुःखातील करुणेची ओल त्याच्या मनात अविरत पाझरत राहते.

सुतारांची कविता ही केवळ प्रादेशिक किंवा वैयक्तिक परिघात अडकलेली नाही, तर ती जागतिक साहित्याशी सेंद्रिय नाते सांगणारी आहे. थोड्या आयुष्यात कवीला उशिरा का असेना डब्ल्यू. एच. ऑडेन आणि रॉबर्ट फ्रॉस्ट यांची ओळख होते. थॉमस हार्डीच्या 'मेअर ऑफ द कॅस्टरब्रिज' कादंबरीतील सुसान या पात्राचा जेव्हा

लिलाव होतो, तेव्हा कवीचे डोळे ओले होतात आणि ते डोळे ओले ठेवूनच कवी पुढे वाचत राहतो, यातून त्याच्या पराकोटीच्या संवेदनशीलतेचा अनुभव वाचकांना येतो. त्याचप्रमाणे, विलियम फॉकनरच्या 'ॲज आय ले डाईंग' या कादंबरीतील कॅश जेव्हा शवपेटी बनवण्याचे सुतारकाम करत असतो आणि त्याची तारांबळ उडते, तेव्हा कवीला कादंबरीबाहेर राहून त्याला मदत करावीशी वाटते. कवीची ही व्याकुळता त्याच्या स्वतःच्या सुतारकामाच्या कौटुंबिक पार्श्वभूमीशी आणि त्यांच्या वडिलांशी म्हणजेच 'दादां'शी तादात्म्य पावणारी आहे.



पांडुरंग सुतार यांच्या कवितांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे समाजव्यवस्थेने दिलेल्या सुतारकामाविषयी कवीने कधीही हीनतेची भावना किंवा तिरस्कार बाळगला नाही. उलट, लाकडाला तासून शेतीची अवजारे आणि घरे बनवणाऱ्या आपल्या पूर्वजांना ते देवदूत मानतात, ज्यांनी मानवी संस्कृतीची उत्क्रांती सुसह्य केली. कवीचे 'दादा' हे या काव्यसंग्रहातील अनेक कवितांच्या निर्मितीचे कारक व नायक आहेत. गरिबी असूनही त्यांनी कधी देवाकडे तक्रार केली नाही, की मजुरीचा कुणाकडे तगादा लावला नाही. दादांचे आम्हा भावंडांवर असलेले प्रेम त्यांच्या रागावण्याइतकेच किंवा सुतारकाम करताना अंगातून निघणाऱ्या घामाएवढे आणि रात्री अंथरुणावर पडल्यावर कंबरेतून निघणाऱ्या ठणकेएवढे सार्थ होते. जुन्या लाकडाच्या देव्हाऱ्यात बसलेले देव कवीला कधी ओळखता आले नाहीत, पण दादांची ही निरपेक्ष आणि संवेदनशील वृत्ती कवीच्या अंतःकरणात खोलवर रुजून बसली आहे. आजच्या भौतिकवादी जगात हे सौजन्य नामशेष होत चालले आहे, म्हणूनच कवी आपल्या दादांची गोष्ट काव्याच्या माध्यमातून अजरामर करू इच्छितो. या कवितेत एकीकडे वारकरी संप्रदायाची नैतिक बैठक आणि श्रद्धा आहे, तर दुसरीकडे आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाची व्यापकता आहे. कवी जुन्या देव्हाऱ्यातील देवांना श्रद्धेने पुजतो. त्या पूजेमागे असलेल्या दादांच्या प्रामाणिक जगण्याला वंदनीय मानतो. कवी भौतिक सुखांच्या मागे धावणारा नाही. तो निसर्गातील घटकांचे–चिमणीचे उडणे, वाऱ्याची झुळुक, गवतफुलांचे डोलणे– केवळ निरीक्षण करूनच समाधानी राहतो. ही कवीची वृत्ती अपरिग्रही आणि अनासक्त आहे.

कोणत्याही कवितेचे मोठेपण हे केवळ तिच्या आशयावर ठरत नाही, तर तो आशय कवी कोणत्या भाषेत मांडतो, यावर अवलंबून असतो. हा संपूर्ण कवितासंग्रह मुक्तछंदात लिहिलेला आहे, परंतु हा मुक्तछंद कुठेही बोजड किंवा गद्यप्राय वाटत नाही. कवीची शैली अतिशय गोष्टीवेल्हाळ आहे, जणू काही कवी आपल्यासमोर बसून जिव्हाळ्याने संवाद साधत आहे. सुतार यांच्या भाषेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची चित्रदर्शी भाषा होय. कवीने निसर्गातून आणि श्रमसंस्कृतीतून घेतलेल्या प्रतिमा अत्यंत जिवंत आहेत. झाडाची पाने पिवळी होऊन झडतात, चांदण्या सकाळी मावळतात, पण कवितांमधले शब्द चिरंतन बसून राहतात, यावर कवीचा गाढ विश्वास आहे. कवीच्या भाषेची दोन टोके विस्मयकारक आहेत; एका बाजूला त्यांच्या भाषेत 'मारुतीचा पार', 'सहाण', 'ठकठक आवाज' असे मातीचे अस्सल श्रमिक शब्द आहेत, तर दुसऱ्या बाजूला जागतिक साहित्यातील संदर्भ अत्यंत सहजतेने त्यांच्या मराठी भाषेचा भाग बनतात. अन्यायाविरुद्ध किंवा असत्याविरुद्ध बोलतानाही त्यांची भाषा आपली पातळी सोडत नाही. असत्य कितीही विध्वंस करून गेले, त्याने मुलांचे हसू हिसकावले, तरीही अखेर सत्याचाच विजय होतो आणि त्यातूनच सृजन टरारून येते, हा कवीचा जीवनविषयक दृष्टिकोन थक्क करणारा आहे.

पांडुरंग सुतार यांच्या 'नामशेष झालेल्या गोष्टी' या संग्रहातील कविता केवळ अनुभवांचे कथन करत नाही, तर त्या कथनाचा घाट आणि आविष्कार मराठी कवितेत

एक अत्यंत वेगळे आणि स्वतंत्र परिमाण निर्माण करतो. त्यांच्या कवितेतील कथनाचे हे वेगळेपण केवळ प्रसंग सांगण्यात नाही, तर ते प्रसंग ज्या भूमिकेतून आणि ज्या पद्धतीने मांडले आहेत त्यामध्ये आहे. हे कथनात्मक वेगळेपण वेधक आहे. या कवितेत आत्मचरित्र असूनही चरित्रकाव्यापलीकडे जाणारे कथन आहे. कवीचे स्वतःचे जीवन, त्याचे घर, त्यांचे दादा (वडील) आणि सुतारकामाची पार्श्वभूमी थेटपणे येते. असे असूनही ही कविता वैयक्तिक रोजनिशी किंवा कौटुंबिक चरित्र बनत नाही. कवी स्वतःच्या अनुभवांना कथनाच्या माध्यमातून वैश्विक संवेदनेशी जोडतो. उदाहरणार्थ, जेव्हा कवी जुन्या देव्हाऱ्याचे वर्णन करतो, तेव्हा तो केवळ एका वस्तूचे वर्णन करत नाही.

लाकडाच्या जुन्या काळ्या झालेल्या देव्हाऱ्यात लाल मंद्रयावर बसून असत देव, ते देव मला कधी ओळखता आले नाहीत. येथे देव न ओळखता येणे आणि तरीही दादांच्या श्रद्धेचा सन्मान करणे, यातून वैयक्तिक आठवणीतून एका व्यापक मानवी संवेदनेचे आणि गूढ दैवी शक्तीचे आकलन करण्यासाठी आपण असमर्थ असल्याची जाणीव सोप्या शब्दांत व्यक्त करण्यात आली आहे.

या कवितेतील कथनाचे सर्वात मोठे वेगळेपण म्हणजे कवी जागतिक साहित्यातील पात्रांशी किंवा लेखकांशी केवळ वरवरचे संदर्भ म्हणून जोडला जात नाही, तर तो त्या पात्रांच्या सुख-दुःखात प्रत्यक्ष सामील होतो. कादंबरीचे जग आणि कवीचे वास्तव जग यांतील भिंतच या कथनात गळून पडते.उदाहरणार्थ, विल्यम फॉकनरच्या 'ॲज आय ले डाईंग' या कादंबरीतील 'कॅश' नावाचे पात्र जेव्हा शवपेटी बनवत असते, तेव्हा कादंबरी वाचणारा कवी त्या कथनाचा भाग बनू पाहतो. तो असा, मला मदत करावीशी वाटली कॅशला, कादंबरीबाहेर राहून, दुरातून, त्याची तारांबळ पाहून... मी त्याला मदत करू शकलो असतो, पण फॉकनरने मला तसे करू दिले नाही. कॅशला एकट्यानेच ते करावे लागले. मदत करू न देण्यासाठी जवळजवळ भागच पाडले मला फॉकनरने, मला राग आला फॉकनरचा, दादांचा येत असे तसा, पण पळून जात असे राग दूर दक्षिणेकडील डोंगराकडे नंतर, दादांच्या सुतारकामाची ठक ठक ऐकल्यावर... तसा फॉकनरवरचाही पळून गेला...



'अॅज आय ले डाईंग' वाचल्यानंतर एका विदेशी कादंबरीतील पात्राच्या सुतारकामाची तारांबळ पाहून कवीला स्वतःच्या दादांच्या सुतारकामाची आठवण येते आणि तो फॉकनरवर रागवतो. वाचकाचे पात्राशी आणि लेखकाशी असणारे हे इतके सेंद्रिय आणि जिवंत नाते मराठी कवितेतील कथनात दुर्मिळ म्हणावे असे आहे.

अमूर्त संकल्पनांचे मूर्त आणि गोष्टीवेल्हाळ रूपात प्रकटीकरण– कवी जेव्हा काळाचे अनंतत्व, मानवी लालसा किंवा सत्य–असत्य यांसारख्या अतिशय गूढ आणि अमूर्त तत्त्वज्ञानाचा विचार करतो, तेव्हा तो कोरडे चिंतन मांडत नाही. त्याची शैली एखाद्या आजोबांनी नातवंडांना गोष्ट सांगावी तशी 'गोष्टीवेल्हाळ' होते. तो अमूर्त संकल्पनांना डोळ्यांसमोर दिसणाऱ्या जिवंत प्रतिमांमध्ये परावर्तित करतो. उदाहरणार्थ, असत्याचा विध्वंस आणि सत्याचा विजय सांगताना कवीचे कथन पहा– असत्य निघून जाते खाली मान घालून, अंधारात, अदृश्य होते... ते पाखरांचे पंख छाटून टाकते / नि मुलांचे हसू हिसकावून घेते... पण अखेर हरते ते, हरतेच, अन् उरते फक्त सत्य, त्या सत्यातूनच निर्माण उभे राहते, सृजन टरारून येते / प्रेम उगवते पुन्हा गवताला अंकुर फुटल्यासारखे... सत्य आणि असत्यासारख्या संकल्पनांना मानवी रूप देऊन, त्यांचा संघर्ष निसर्गाच्या माध्यमातून सांगण्याची ही पद्धत कवीच्या कथनाला कमालीचे प्रवाही बनवते.

भावनिक ओलावा आणि आक्रस्ताळेपणाचा अभाव (तटस्थ संवेदनशीलता)–आजच्या काळातील कथनात्मक किंवा विद्रोही कवितांमध्ये अनेकदा आक्रोश, चिडचिड किंवा उद्वेग असतो. समाजव्यवस्थेने दिलेल्या दुय्यमतेचा तिरस्कार असतो. परंतु सुतारांच्या कथनात सुतारकामाविषयी कमालीचा अभिमान आणि आदर आहे. त्यांचे कथन अत्यंत ऋजू, संथ आणि भावनिक ओलावा असणारे आहे. कवी स्वतः दुःख सोसताना कमालीचा तटस्थ राहतो, पण इतरांच्या दुःखाचे कथन करताना कमालीचा संवेदनशील होतो.

उदाहरणार्थ, थॉमस हार्डीच्या कादंबरीतील 'सुसान'चा लिलाव होत असतानाचे कथन पहा–

माझे डोळे ओले होत असत तिचा लिलाव सुरू असतानाचे वाचताना / मी ते ओले डोळे तसेच ठेवून पुढे वाचत असे. येथे कवीचे डोळे ओले आहेत, पण तो वाचन थांबवत नाही. ही 'तटस्थ संवेदनशीलता' त्यांच्या कथनाला एक वेगळेच वजन प्राप्त करून देते.

शब्द आणि भावनांच्या अपरिग्रहाचे कथन– या कवितेतील कथनाचा शेवटचा आणि महत्त्वाचा पैलू म्हणजे, कवी स्वतःच्या अभिव्यक्तीच्या मर्यादा प्रांजळपणे मान्य करतो. निसर्गाची अथांगता आणि स्वतःचे लहानपण यांचे अत्यंत प्रामाणिक कथन कवी करतो.

उदाहरणार्थ, निसर्गाचा आनंद घेताना कवी आपली मर्यादा कशी सांगतो पहा–

पण मला चिवचिवता येत नाही चिमणीप्रमाणे / उडताही येत नाही या झाडावरून त्या झाडावर... बसून राहतो मी खिडकीत / चिमणीची चर्रर्र अन् चिवचिव ऐकत... आनंदित होतो थोड्या आयुष्यात...

स्वतःला निसर्गाचा मालक न समजता, केवळ एक मूक साक्षीदार मानून जीवनाचा आस्वाद घेण्याची ही वृत्ती त्यांच्या कथनाला एका संतकवी तुकारामांच्या कथनशैलीच्या पातळीवर घेऊन जाते.

पांडुरंग सुतार यांच्या कवितेतील कथनाचे वेगळेपण हे आहे की, ते स्थानिक मातीतील श्रमसंस्कृतीची (सुतारकामाची) 'ठकठक' आणि जागतिक साहित्यातील संवादाची 'अथांगता' या दोन्ही टोकांना अत्यंत सहजतेने एकाच पातळीवर आणून जोडतात. हे सोपे, ऋजू आणि प्रगल्भ कथन मराठी काव्यविश्वात अत्यंत विरळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे.

थोडक्यात सांगायचे तर, पांडुरंग सुतार यांच्या कवितेची भाषा ही केवळ अभिव्यक्तीचे माध्यम नाही, तर ती त्यांच्या आत्म्याचा आरसा आहे. त्यांच्या कवितेत कुठेही द्वेष, आकस किंवा कटुता नाही. वर्तमानातील माणसांना निसर्ग आणि श्रमपूजक बनवून, पुन्हा एकदा मानवी जीवनाकडे सश्रद्ध, संवेदनशील आणि करुणामय वृत्तीने पाहण्याचा मोलाचा संदेश ही कविता देते. 'नामशेष झालेल्या गोष्टी' ही कविता मराठी काव्याच्या प्रांतात आपल्या आंतरिक शांततेने आणि करुणेच्या ओलाव्याने प्रदीर्घ काळ रसिकांच्या मनात घर करून राहील.



आम्ही मातीचे सांगाती

माती आणि आभाळाचं नातंही असंच घट्ट. आभाळ रुसलं की मातीला चरे जातात, तिच्या उष्ण भूगर्भात खूप मोठी उलथापालथ होते, ऋतुचक्र बदललं की मातीला सहन कराव्या लागतात त्या अनंत भोगवेळा. कधी शेतकऱ्याचा आक्रोश तर कधी हृदय पिळवटून टाकणाऱ्या, न भरून निघणाऱ्या जखमा.ही माती रुसून बसते आकाशाच्या हट्टीपणामुळे. तिला हवा असतो मायेचा गिलावा. तिला जोजवायच्या असतात हिरव्या अंकुराच्या कोवळ्या वेणा. पण ठरलेल्या ऋतूला ठरलेल्या वेळा जपता नाही आल्या की उठतात उष्ण ज्वाळा, तन-मन-धन जळणाऱ्या.

मृणाल देशपांडे

९४२३७७९५५३

मातीलाही लागावेत शुद्ध अत्तराचे डोहाळे
मातीतच रुजावे स्वप्न राजस कोवळे

तसंच काहीसं नातं माझं आणि मातीचं आहे. तिचा काळाशार रंग लेवून घ्यावा साऱ्या अंगभर आणि अंकुरावं माझ्यातही तिच्यासारखं गंधाळलेलं काहीबाही. अंकुराची आई होऊन जोपासते ती आपली माया. तिचा निःस्वार्थपणा, तिचा हळवेपणा, त्यासोबतच तिचा क्षमाशील स्वभाव अंगीकारू देते मला.

तिची माझी नाळ तशी जन्माशी बांधेलेली,

ती आहे म्हणून जन्म आहे. ती आहे म्हणून शेवट आहे.. शेवटचा प्रवासही तिचा हात धरून होतो, तसंच सुरुवातही तिच्याचपासून.

काळ्या तनुला कंप सुटावा तशी थरारते, क्वचित घाबरतेही, पण भक्कम साथ केवळ ह्या मातीचीच मिळते हे नक्की.. प्रेमाच्या आणाभाका तिच्या साक्षीने होतात. न घट्ट मिटणाऱ्या ज्वाळेला तिचाच भास होत राहतो.

आकाश आणि मातीचं नातं किती सुरेख आहे बघा! आकाशातून पडणाऱ्या एका थेंबावर मातीचं निरागस सौंदर्य खुलून येतं, तिच्यात रुजतं ते अनाम प्रेम, माया, ममता, ती समावून घेते साऱ्याला, मागत मात्र काहीच नाही, देण्याचा दानशूरपणा अनुभवावा तो फक्त मातीच्या सांगतीने. आकाश आणि धरेच्या ह्या मिलनात अंकुरतो एक कोवळा जीव आणि बहरून येतो त्याच्या आत्ममग्न क्षणासहित.

निर्मितीचा विचार मनात आला अन् काही क्षण मनाने पॉज घेतला, काय असेल तिच्या (मातीच्या) निर्मितीची प्रक्रिया? जेव्हा केव्हा माणूस घडला तेव्हाच मातीचा जन्म झाला? की आधी मातीचा जन्म आणि तिच्या नाळेशी जोडलेले आपण असं काही असेल का हा प्रवास? शास्त्र तर आपण सगळे जाणतोच, पण जेव्हा ह्या मातीत मन, भावना, आत्मा आहे असं म्हणतो तेव्हा तिच्यात एक जिवंतपणा आहे, तिच्यात आपल्या आत्म्याशी जोडणारा तो एक धागा आहे, जो आपल्याला तिच्यातून मुक्त होऊ देत नाही. तो धागा मला जगण्याची उभारी देतो. तिचे निरालस, निःस्वार्थ वागणं मला जीवनाच्या सुसूत्रतेत बांधतं. काय घ्यावे तिच्याकडून तर हे असं निःस्वार्थ जगणं शिकावं! जगण्याच्या सगळ्या वाटांमध्ये जे पेराल ते रुजेल, उगवेल हे शिकावं!

आपल्याला जसं रंगांचं वेड आहे तसंच मातीलाही तिच्या रंगांनी सार्थता मिळते. काळीशार माती, लाल माती, पांढरी माती, असेच अनेक ठिकाणी मातीचे रंग बदलत असले तरीही तिची एकतानता, तिचा तोच अंगीकरलेला निःस्वार्थीपणा तसूभरही कमी होत नाही, कारण ती भेदभाव करत नाही.ती आपलं परकं मानत नाही, तिच्या अंगी नाकारण्याची वृत्ती नाही, ती आपण देऊ तसं जोपसते. आलेल्या प्रत्येक लडिवाळ क्षणांना, प्रत्येक मनापमानांना ती सरसावून झेलते, तिला तिच्या असण्याचा अहंकार नाहीय... माणसाने माणुसकी सोडली तरी माती तिचा रुजण्याचा, रुजवण्याचा आणि त्यातून उगवण्याचा डौल सोडत नाही की कुणाच्या अस्तित्वाच्या चिंधड्या उडवीत नाही...

प्रेम कर भिल्लासारखं
बाणावरती खोचलेलं
मातीमध्ये उगवून सुद्धा
मेघापर्यंत पोहचलेलं

मातीसारखं जगता आलं पाहिजे, मातीसारखं रुजता आलं पाहिजे, आईसारखं संगोपन केवळ मातीच करू जाणे.तुडवून जा, फेकून जा, पण ती फुलवत राहते, आभाळभरल्या स्वप्नांना, जोजवत राहते. जीवनाशी एकरूप होणं सुलभ करत राहते.

रवींद्रनाथांच्या कवितेचा एक स्वैर अनुवाद वाचण्यात आला, रेणू देशपांडे याचा,

अपमानाचं उत्तर
फुलांनी देणारी
ही माती...

बापरे क्षणभर मन थरारलं ह्या ओळीनी, काय जरब आहे शब्दात, परकोटीचा आत्मविश्वास ह्या मातीबद्दल... हीच ती माती आपण जगताना आपल्या श्वासात अत्तर पेरणारी, हीच ती माती आपल्या सुखदुःखात आपल्याला संयम शिकवणारी.

कृष्णनाथ निकम ह्यांची एक कविता वाचण्यात आली.

ती मात्र पूर्ण वाचते हं.

किती मातीत हिरव्या या कपाळीच्या ओंब्या
ये आभाळीच्या वडा आता फुटून पारंब्या।
वेळ झाली आता गड्या खेळ मातीशी मांडावा
अहेवाच्या गर्भासवे देह मातीत सांडावा ।
पाखरांच्या डोळ्यातले रंग अस्मानी भिनले
परी मनात रे तुझे रूपं जांभळे सजले ।
दिशा पुसतात मला दग्ध राधेचे ते प्रश्न
कशी सांगू मी तुम्हाला माझाही आहे कृष्ण ।
स्वर श्रावण वेणूचे ठिबकती फांदीवर
वृक्ष उभारी थकून तुझा मागे गहिवर ।।

तिच्या अहेवपणाचा सोहळा खूप सुरेख असतो. मात्र तो अनुभवायला आपल्याला ते नातं मातीशी मातीत राहूनच जुळवून घ्यावं लागतं हे नक्की. कॉलेजमध्ये असताना ह्या मातीचे सगळे रूपं अनुभवले नाही, पण आज आता ह्या वयाच्या परिपक्वतेच्या उंबरठ्यावर ह्या मातीशी असलेली, जुळलेली नाळ मात्र खुपशा गोष्टी कानात सांगत असते, अंतरीचं गूजच म्हणावं तसं काहीसं.पुनर्निर्मितीचा अनुभव आला की मातीला आपल्यात रुजण्याची अनुमती आपण देतो, ती मग आपल्याला अंकुरण्याच्या कळा देते आणि मग फुलून येतो तारुण्याचा बहर.

ना. धों महानोर काय सुरेख लिहितात. त्यांना नुसतं वाचून नाही तर त्याच्या सोबत त्या कविता मातीत राहूनच अनुभवाव्या असं नेहमी वाटत राहिलं. पण हे वाटणं मात्र

सत्यात उतरलं नाही हे मात्र सत्य. माणूस गेला की त्याच्या नसण्याची उणीव कधीही भरून निघणारी नसते, परंतु त्यांचे शब्द, त्या शब्दांनी अजरामर झालेले गाणे, उभारी देतात.

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि मातीतुनी चैतन्य गावे...

किती सुंदर कल्पना आहे की मातीतून चैतन्य गावे. ह्या मातीकडून काय अपेक्षा आहेत बघा? पण एका अवलिया कलाकारालाच हे शब्दवैभव मिळू शकतं.

थोडं थोडं शिकत आपण पुढे पुढे जात आपल्या विकासाचा मार्ग निवडतो, पण मग मातीशी असलेली नाळ तुटते का? तेही इतक्या सहजासहजी? आपण म्हणतो आपलं गाव सुटलं, शहर सुटलं की हरवतो आपण सिमेंटच्या जंगलात. आपलं माणुसपणही हरवून बसतो, आपली ओळख विसरतो! खरं आहे का हे सारं? आपल्या मागची पिढी मातीत जन्मली आणि मातीतच विरली, पण आपण? आणि सगळ्यात सातवणारा प्रश्न आपल्या नंतरची पिढी? तिला आहे त्या मुसमुसलेल्या मातीची ओढ? तिला ह्या साऱ्याची आहे का जाणीव? मातीचे जीवघेणे प्रश्न सोडवताना आदल्या पिढीची होणारी तगमग जाणवते का? सुकत चाललेल्या भेगा, खचत चाललेला मातीचा आधार, तुटत चाललेली नाती? हे जाणिवांना जोडून ठेवेल की तोडून टाकतील आपल्या घरट्याच्या पारंब्या? खोल मुळापर्यंत पोहचेल ती ओल?

आपण तर काळ्या मातीच्या मातीत तिफन चालते
हे ऐकत, त्यावर नाचतच मोठे झालो.

एक मात्र आहे की, आपण अगदीच ह्या पिढीला नाकर्ते, अरसिक किंवा कामचलावू नाही ठरवू शकत. त्यांच्यातही प्रतिभा आहे, कौशल्य आहे, व्यक्त होण्याची ताकद आहे. हा फक्त त्यांची शैली, भाषा, वैचारिक बैठकीत बदल झाला आहे.त्याला वे ऑफ एक्सप्रेशन आणि लिबर्टी म्हणूयात?

ही मातीशी असलेली नाळ नाही इतक्या सहजासहजी तुटू शकते. तिची ओल आणि पकड इतकी घट्ट आहे, अन् इतक्या खोल पाळामुळासहित आपल्यात रुजली आहे की तिला आपण आपल्यापासून दूर नाही करू शकत.

माती आणि आभाळाचं नातंही असंच घट्ट. आभाळ रुसलं की मातीला चरे जातात, तिच्या उष्ण भूगर्भात खूप मोठी उलथापालथ होते, ऋतुचक्र बदललं की मातीला सहन कराव्या लागतात त्या अनंत भोगवेळा. कधी शेतकऱ्याचा आक्रोश तर कधी हृदय पिळवटून टाकणाऱ्या, न भरून निघणाऱ्या जखमा.ही माती रुसून बसते आकाशाच्या हट्टीपणामुळे. तिला हवा असतो मायेचा गिलावा. तिला जोजवायच्या असतात हिरव्या अंकुराच्या कोवळ्या वेणा. पण ठरलेल्या ऋतूला ठरलेल्या वेळा जपता नाही आल्या की उठतात उष्ण ज्वाळा, तन-मन-धन जळणाऱ्या. डोळ्याच्या ओल्या कडा पाणावून कोसळत नाहीत, आणि डोळे कोरडे होऊन शुष्क होत नाहीत तोपर्यंत आभाळ आपली परीक्षा घेत असतं. पाण्याचं हे दान आपल्या फाटक्या झोळीत टाकताना अपरिमित परीक्षा द्याव्या लागतात हे टळटळीत सत्य आहे.



शांताबाई शेळके फार सुरेख लिहितात–

आला पाऊस मातीच्या वासात गं,
मोती गुंफीत मोकळ्या केसात गं,
आभाळात आले काळे काळे ढग,
धारा कोसळल्या निवांत तगमगं,
धुंद दरवळ धरणीच्या श्वासात गं
मोती गुंफीत मोकळ्या केसात गं....

शब्दांच हे अलौकिक देणं असं पावसासारखं कोसळत आणि तृप्त शांत होत जातं मन, तर विचार करा ह्या पावसाचं आणि मातीच नातं किती अलौकिक आणि नितांत सुंदर आहे.ते जपूया आपण.

माणसाच्या बेजबाबदार वागण्याचे चटके ह्या बिचाऱ्या मातीला सहन करावे लागतात. आणि त्याची पोच हे आभाळभर ठेवत असतं. शुद्ध आणि पवित्र मृत्तिकेला आपण म्हणजे मानवाने अशुद्ध केले, त्यावर कचऱ्याचे ढीग, प्लास्टिकचे ढीग, वापरून फेकून दिलेल्या वस्तूचे ढीग, ह्या साऱ्या साऱ्यात तिचं अस्तित्व संपवतोय आपण. पवित्र आणि शुद्धतेच्या व्याख्या बदलाव्या इतक्या मोहाच्या गर्तेत आपण गुंतत जातोय आणि ते भोग भोगतेय ही धरा, ही पृथा.

ह्या धरेचं खरं सौंदर्य आहे ते तिच्या हिरव्यागार असण्यात. समृद्धीने नटलेल्या हिरव्यागार पानांफुलात, पावसाच्या थेंबाने तृप्त होणारी ही धरणीमाय आपल्या स्वार्थी आणि कपटी वागण्याने चिडून जाते. वाटेल तसे तुडवतो आपण तिला. वाटेल तसं वागतो आपण तिच्या आणि निसर्गाच्या विरुद्ध जाऊन. जमिनीचा कस बदलतोय, तिच्या काळ्या रंगाला मनुष्यप्राणी शाप ठरतोय. जागतिक तापमान वाढतंय (आताच्या भाषेत त्याला ग्लोबल वॉर्मिंग म्हणतो) कारण झाडं कापली जाताहेत, निसर्गाचा समतोल ढासाळतोय, कारण सिमेंट आणि प्लास्टिक जंगल वाढतंय, कचऱ्याचं प्रमाण वाढतंय आणि माणसाचं वागणं बेछुट झालंय. त्याला कसलाही धरबंध राहिलेला नाही. कोणाचा धाक नाही. केवळ मनमानी सुरू आहे. हे कुठेतरी थांबलं पाहिजे. उद्याच्या पिढीला पाणी, शुद्ध हवा, शुद्ध वातावरण हवं असेल तर आजच ठोस प्रयत्न सुरू झाले पाहिजेत.

नैसर्गिक आपत्ती येतीलच. भूकंप, भूस्खलन, जंगलांना आग लागणं, हे सगळं होईलंच, पण जोपर्यंत मानवी प्रयत्न १०० % निसर्गाच्या राखणीसाठी होत नाहीत तोपर्यंत हा विनाश असाच सुरू राहील. निसर्गाला अबाधित ठेवायचं असेल तर ही धरा, ही माती जोपासली गेली पाहिजे. माती आणि आपल्या जीवनाचे सार एकच आहे. कबीर म्हणतात त्याप्रमाणे–

माटी कहे कुम्हार से तू क्या रोंदे मोहें
एक दिन ऐसा आयेगा मैं रोंदूंगी तोहे...

मातीला जेव्हा मन भावना आहे म्हणतो, तेव्हा मातीला तयार करणाऱ्या कुंभाराला माती म्हणते की, आता तू जे काही करतोय माझ्यासोबत, तेच मीही करू शकते. मीही तुला यातना, त्रास देऊ शकते, पण आभाळाचं मन, दातृत्व असलेली असलेली ही माती असं करत नाही आपल्यासोबत.

थोडक्यात, ईश्वराने मनुष्याला किंवा मनुष्याच्या शरीराला पाच तत्त्वांनी तयार केले आहे. जल म्हणजे पाणी, वायू म्हणजे हवा, पृथ्वी म्हणजे पृथा, अग्नी म्हणजे आग, आणि आकाश म्हणजे हे अथांग आभाळ. कुंभार जेव्हा मातीच्या वस्तू किंवा भांडे तयार करत असतो तेव्हा तो ती माती मळून घेतो, मऊ लोण्यासारखी तयार करून घेतो. नंतर त्याला हवा तसा, हवा तेवढा आकार देतो आणि मग ते भांडं किंवा वस्तू तयार होते. पण ह्या सगळ्या प्रक्रियेत मातीवर होणारे आघात किंवा मातीला होणारा त्रास ती सहन करते. जन्म आणि मृत्यूचा फेरा असाच आहे. जन्मलेला प्रत्येक जीव शेवटी एक दिवस जातोच. मातीतच विरतो, संपतो...पण माती आणि माणसाची नाळ अबाधित राहते...

कधीही न तुटण्यासाठी...

शेवटी कुसुमाग्रज म्हणतात ते असं काहीसं...

आकाशपण हटता हटत नाही
मातीपण मिटता मिटत नाही,
आकाश आणि मातीच्या या संघर्षात
माझ्या जखमांचं देणं फिटता फिटत नाही...



ग्रंथस्पंदन

एकोणतीस पुस्तकांची स्पंदने आपल्या लेखातून टिळकसरांनी ह्या Books on Books प्रकारातील 'ग्रंथस्पंदन' ह्या पुस्तकात दिली आहेत. हे सारे लेख निव्वळ पुस्तक परिचय नाहीत. हे लेख म्हणजे ते पुस्तक वाचताना/ वाचल्यावर मनात आलेल्या असंख्य विचारांचा घेतलेला धांडोळा. कदाचित लेखकाचं स्वगत... चिंतन. जेव्हा टिळक सर जेव्हा पुस्तकाबद्दल विचार करतात तेव्हा तो साधासुधा पुस्तक परिचय नसतो. पुस्तक वाचताना त्या विश्वाची रोजच्या जगण्याशी घातलेली सांगड असते. त्या त्या विषयानुरूप असलेल्या इतर पुस्तकांशी सांगड असते.

श्रेया राजवाडे

वाचनाची आवड बऱ्याच जणांना असते. कधी कधी आपल्या वाचनाचा एक विशिष्ट परीघ तयार होतो. तो ओलांडून नवे काही वाचावे ह्यासाठी आपले मन सहसा तयार होत नाही. बदल शक्यतो नकोच असतो कोणाला! पण कोणी आवर्जून एखादे पुस्तक वाचण्यास सुचवले किंवा त्या पुस्तकातील विषयाचे मर्म उलगडून दाखवले की ते पुस्तक वाचण्याची उत्सुकता वाटते, ओढ वाटते. ते पुस्तक वाचण्यात अधिक आनंद मिळतो.

श्री. चन्द्रशेखर टिळक म्हणजे सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, संवेदनशील मनाचे लेखक आणि कवी, वाग्देवीचा वरदहस्त लाभलेले उत्कृष्ट व्याख्याते आहेत. त्यांना ओजस्वी बुद्धिमत्तेचं आणि स्मरणशक्तीचं वरदान आहे. ह्या अंगभूत गुणांना त्यांनी प्रयत्नपूर्वक जोपासले आहे. 'आपल्याला जे जे समजले ते ते इतरांना सांगून शहाणे करून सोडावे' ह्यासाठी अविरत धडपड करणारे व्यक्तिमत्त्व. आपल्या संस्कृतीत ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून निरलस काम करणारे ऋषी होते, तसेच काहीसे मला टिळक सरांचे कार्य बघून वाटते.

ग्रंथस्पंदन ह्या त्यांच्या नूतन प्रकाशित पुस्तकाचे वैशिष्ट्य त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण नावातून सहज समजते. स्पंदन सुरू असते तोवर जीवन सुरू असते. ग्रंथ स्पंदन सुरू असेल तर बुद्धी कार्यरत असते. मनोवृत्ती तल्लख असते. म्हणूनच हे ग्रंथस्पंदन थांबू नये, वाचन कधी थांबू नये हे सांगणारे पुस्तक म्हणजे ग्रंथस्पंदन हे पुस्तक.

टिळक सरांनी त्यांचे जीवन असणाऱ्या त्यांच्या पत्नीला म्हणजे सौ. स्नेहाताई टिळक ह्यांना समर्पित केले आहे. हे एका अर्थी भावजीवनातील स्पंदन.

कोल्हापूर येथील सृजनशील चित्रकर्ती प्रिया देशपांडे हिने मोठे कलात्मक रूपक योजून मुखपृष्ठ तयार केले आहे. बुकमार्क म्हणून दिसणाऱ्या एका पानावरून एक तेजस्वी निळसर दवबिंदू ओघळत आहे. त्याची निळी आवर्तने निर्माण होत आहेत. निळा रंग म्हणजे अमर्याद विस्तार दाखवणारा. आपल्या वाचनातून निर्माण झालेली ही स्पंदने आपल्या विचारांचा आवाका अमर्याद विस्तारू शकतील असं सांगणारं हे मुखपृष्ठ असावं असं मला वाटत राहिलं.



एकोणतीस पुस्तकांची स्पंदने आपल्या लेखातून टिळकसरांनी ह्या Books on Books प्रकारातील 'ग्रंथस्पंदन' ह्या पुस्तकात दिली आहेत. हे सारे लेख निव्वळ पुस्तक परिचय नाहीत. हे लेख म्हणजे ते पुस्तक वाचताना/ वाचल्यावर मनात आलेल्या असंख्य विचारांचा घेतलेला धांडोळा. कदाचित लेखकाचं स्वगत... चिंतन.

जेव्हा टिळक सर जेव्हा पुस्तकाबद्दल विचार करतात तेव्हा तो साधासुधा पुस्तक परिचय नसतो. पुस्तक वाचताना त्या विश्वाची रोजच्या जगण्याशी घातलेली सांगड असते. त्या त्या विषयानुरूप असलेल्या इतर पुस्तकांशी सांगड असते. लेखकाने लिहिलेल्या काही वेचक विचारांच्या अंतरंगात डोकावताना जे लेखकाने दोन वाक्यांच्या दरम्यान लिहिले नाही तेदेखील सूक्ष्मपणे जाणून घेण्याचा प्रयत्न असतो.

'खेळ मांडियेला' ह्या भातुकली ह्या विषयाला समर्पित पुस्तक ते 'एक उलट एक सुलट', 'रावा' ह्या दोन पुस्तकातले साम्य आणि फरक असं सांगत, पुस्तक परिचय, 'चित्रकार गोपाळ देऊसकर, दीनानाथ दलाल, शिल्पकार करमरकर ही अशी चित्रकला/ कलाकार संबंधित पुस्तके तर कधी गोपाळराव गोडसे ह्यांचं 'लाल किल्ल्यातील आठवणी' असे विषयांचे वैविध्य असलेल्या पुस्तकांबद्दल टिळक सर व्यक्त झाले आहेत.

दि. बा. मोकाशी ह्यांनी लिहिलेल्या पालखी, अठरा लक्ष पावलं, देव चालले ह्या पुस्तकांबद्दल व्यक्त होताना टिळकसर सूक्ष्मपणे एक एक विचार उलगडत जातात ते फार विलक्षण आहे. आपल्याला हे वाचताना वाटत राहतं की, पुस्तक वाचताना आपणही ही वाक्यं वाचली, पण आपल्याला हे जाणवलं नाही. ह्याचं कारण मला असं वाटतं की, आपण ती वाक्यं डोळ्यांनी वाचलेली असतात, पण टिळक सरांनी मात्र कदाचित त्या वाक्याच्या पलीकडले कितीतरी धागे जोडून घेतलेले असतात. त्या प्रसंगाच्या अंतरंगातील अंतराळ त्यांनी शोधलेले असते. म्हणूनच टिळक सरांनी एखाद्या पुस्तकाची ओळख करून दिली की त्यानंतर ते पुस्तक वाचताना अधिक समाधान वाटते.

ह्या पुस्तकाचा बाज हा टिळक सरांच्या अंगभूत वक्ता ह्या विशेषाला साजेसा आहे. लिहिता लिहिता संवाद साधत टिळक सर व्यक्त झालेले आहेत. एक अनौपचारिक चौकटीबाहेरचा मोकळेपणा ह्या लेखनात आहे. म्हणूनच तो अधिक प्रसन्न, ताजा आहे.

ग्रंथस्पंदन मालिकेतले हे पुस्तक म्हणजे पहिले पुष्प. असे पुढचे अधिकाधिक भाग प्रकाशित व्हावेत आणि सजग वाचकवर्ग निर्माण होण्याला चालना मिळावी असं मला वाटतं.



काव्यफुले : समाजप्रबोधनाची सुमने!

'फुलपाखरू व फुलाची कळी' ह्या रचनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही कविता चार कडव्यांची असून प्रत्येक कडव्यात सोळा ओळी आहेत. या माध्यमातून कवयित्री फुलपाखरू कळीवर एकप्रकारे कसे अत्याचार करतो त्यावर प्रकाश टाकताना फुलपाखरू कळीचे रूप कसे छिन्नविच्छिन्न करून नकोसे करतो हे सांगून फुलपाखराच्या माध्यमातून एक सामाजिक रीतही त्यांनी शब्दबद्ध केली आहे. सुंदर फुले अर्थात स्त्री आणि फुलपाखरू म्हणजे समाजातील दुष्ट प्रवृत्ती ही सांगड घालताना कवयित्री सावित्रीबाई यांची सुक्ष्मदृष्टी लक्षात आल्याशिवाय राहत नाही...

नागेश शेवाळकर

९४२३१३९०७१

थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले यांचा 'काव्यफुले' हा काव्यसंग्रह सन १८५४ या वर्षी प्रथम प्रकाशित झाला. या काव्यफुलांचा टवटवीतपणा, मनमोहक सुगंध सुमारे पावणेदोनशे वर्षांनंतरही जशास तसा आहे हे जाणून तो सुगंध आजच्या वाचकांपर्यंत पोहोचला पाहिजे या जाणिवेतून श्री. घनश्याम पाटील, चपराक प्रकाशन, पुणे यांनी ९ मे २०२६ रोजी तो मनमोहक स्वरूपात पुनर्मुद्रित केला आहे. विशेष म्हणजे या काव्यसंग्रहाचे कृष्णधवल मूळ मुखपृष्ठ आतल्या पानावर छापले असून नवीन रंगीत असे आकर्षक मुखपृष्ठ ज्योती घनश्याम यांनी चितारले आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक, संशोधक संजय सोनवणी यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे. या संग्रहात त्या काळातील समाजप्रबोधन हे कदाचित आजही तितकेच महत्त्वाचे नि गरजेचे आहे हे जाणून प्रकाशक पाटील यांनी हे पाऊल उचलले असल्याचे लक्षात येते.

काव्यसंग्रहातील प्रत्येक काव्य वसंततिलका, ओवी, अनुष्टुभ, अभंग, अष्ट मात्री, अक्षर छंद, दिंडी इत्यादी लेखन प्रकारात बद्ध केले आहे. तसेच त्यांचे काव्य सामाजिक जाणीव, करुणा यासोबतच आत्मभान जागविणारे, निसर्गाचे चित्रण करणारे, प्रार्थनामय, बोधात्मक, शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे, अंधश्रद्धा दूर करणारे, स्त्री शिक्षण आणि स्वाभिमान जागृत करणारे आहे. यावरून सावित्रीबाईंचा सखोल अभ्यास, ज्ञानलालसा समजून

येतेच, परंतु काव्यरचनेच्या माध्यमातून समाज जागृतीची तळमळही समजून येते.





विशेष म्हणजे सावित्रीबाईंनी प्रास्तविका, अर्पणिका याही काव्यात व्यक्त केल्या आहेत. प्रास्तविकेत त्या काव्यात्मक रचना सादर करतात. त्याचा थोडक्यात आशय म्हणजे, 'माझ्याजवळ जी सुगंधित काव्यफुले आहेत, त्यांची माळ तयार करून ती अर्पण करीत आहे. या काव्यफुलांच्या वाचनामुळे वाचकांना एकप्रकारची मानसिक शांती मिळेल. काव्यफुले संग्रह वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम मिशनरी छापखान्याने पूर्ण केल्यामुळे त्यांचे आभार!'

कोणत्याही पुस्तकाची अर्पणिका (अर्पणपत्रिका) ही महत्त्वाची असते. रचयित्री सावित्रीबाई फुले यांनी वसंततिलका वृत्तामध्ये लिहिलेली अर्पणिका अर्थपूर्ण आहे...

मजवर सकळाची भाव भक्ति विशाला
हृदय भरुनि येते वाटते हे कशाला
उपकर कृति आहे भार होई मनाला
सुजन हितकारांना अर्पित ही सुमाला

महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अनुष्टुभ छंदात कवयित्रीने आदरयुक्त भावना व्यक्त करताना त्यांचे सकाळी सकाळी स्मरण करावे असे सुचवले आहे...

छत्रपती शिवाजीचे। प्रातःस्मरण करावे
शूद्रादि अतिशूद्रांचा। प्रभु वंदू मनोभावे
नळराजा युधिष्ठिर। द्रौपदी ही जनार्दन
पुण्यश्लोक पुराणात। इतिहासी शिवानन

महात्मा जोतिबा फुले हे सावित्रीबाईंचे केवळ पती नव्हते तर ते त्यांचे शिक्षक, मार्गदर्शकही होते. त्यांच्याबद्दलचा अपरंपार भाव सावित्रीबाई 'जोतिबांना नमस्कार' या रचनेतून व्यक्त करतात...

जोतिबांना नमस्कार। मनोभावे करतसे
ज्ञानामृत आम्हां देई। अशा जीवन देतसे
थोर जोति दीन शूद्रा। अतिशूद्रा हाक मारी
ज्ञान ही ईर्षा देई। तो आम्हाला उद्धरी

'राणी छत्रपती ताराबाई' यांच्याबद्दल सावित्रीबाईंनी खूप छान रचना सादर करताना ताराबाईच्या शौर्याचा जिव्हाळ्याने उल्लेख केला आहे...

छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई
कोल्हापूरची जगदंबा महिराष्ट्राची अंबाई
शत्रुवर घाली छापा काळ तयाची ती होई
जेरीस शत्रूला करून करी बेफाम चढाई

अगोदर लिहिल्याप्रमाणे या संग्रहात रचयित्री सावित्रीबाई यांनी अनेक विषय हाताळले आहेत. त्यापैकी नैसर्गिक काव्यात 'पिवळा चाफा' या पुष्पाचे गुणविशेष वर्णन करताना शेवटचे कडवे मात्र वाचकाला स्तब्ध करते. फुले लिहितात...

नेत्र नासिका
रसिक मनाला
तृप्त करूनी
मरून पडतो

त्याचप्रमाणे 'जाईचे फूल' या काव्यातून जाईच्या फुलाचे सुरेख वर्णन 'अक्षर बंद' या काव्य प्रकारातून वाचायला मिळते. या रचनेचे नि काव्य प्रकाराचे प्रमुख

वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक कडव्यात चार ओळी असून पहिल्या आणि तिसऱ्या ओळींमध्ये पाच अक्षरे असून दुसऱ्या आणि चौथ्या ओळीत प्रत्येकी सहा अक्षरे आहेत. अक्षरांच्या संख्येचा तोल सांभाळताना रचना आशयघन वाचनीय होईल अशी काळजी सावित्रीबाईंनी नक्कीच घेतली आहे. ह्या काव्याचा शेवट करतानाही त्या एक सामाजिक धगधगते वास्तव समोर आणतात...

रीत जगाची
कार्य झाल्यावर
फेकुन देई
मजला हुंगुन

'फुलपाखरू व फुलाची कळी' ह्या रचनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही कविता चार कडव्यांची असून प्रत्येक कडव्यात सोळा ओळी आहेत. या माध्यमातून कवयित्री फुलपाखरू कळीवर एकप्रकारे कसे अत्याचार करतो त्यावर प्रकाश टाकताना फुलपाखरू कळीचे रूप कसे छिन्नविच्छिन्न करून नकोसे करतो हे सांगून फुलपाखराच्या माध्यमातून एक सामाजिक रीतही त्यांनी शब्दबद्ध केली आहे. सुंदर फुले अर्थात स्त्री आणि फुलपाखरू म्हणजे समाजातील दुष्ट प्रवृत्ती ही सांगड घालताना कवयित्री सावित्रीबाई



यांची सुक्ष्मदृष्टी लक्षात आल्याशिवाय राहत नाही...

रीत जगाची
उच्छृंखल ही
पाहुनिया मी
स्तिमित होई

'दिंडी' या काव्य प्रकारातून साकारलेली 'द्रष्टा कवी' या रचनेत कवींची, त्यांच्या ज्ञानाची, त्यांच्याजवळ असलेल्या चौसष्ट कला आणि नवरस यांची स्तुती करताना कवयित्री लिहितात,

कधी कल्पी मी 'विश्व' मित्र आहे
काव्य माझे हे प्रतिसृष्टी आहे
दिव्य सृष्टीचे काव्य हे तयाचे
जीणे राहते सुंदर शिव साचे

सावित्रीबाई फुले ह्या शिक्षिका असल्यामुळे त्यांचे विद्यार्थिनींशी आणि बालकांशी जवळचे संबंध होते. शिक्षिका आणि मायेचे नाते या भूमिकेतून त्या बालकांना सुयोग्य सवयी लागाव्यात, सुसंस्कार व्हावेत म्हणून 'श्रेष्ठ धन' या रचनेत मोलाचा संदेश देतात...

प्रातःकाळी करी बाळा।
शौचादि मुखमार्जन
होऊनिया शुचिर्भूत।
वंदू माता पिता जन

त्याच भूमिकेतून त्या 'बाळास उपदेश' या चारोळीतून अनमोल असे मार्गदर्शन करतात, वेळेवर काम करण्याचे महत्त्व अधोरेखित करतात...

करणे काम आजी ते। आताच कर खेचून
जे दुपारी करायचे। ते आताच कर जाऊन
क्षणानंतरचे काम, या क्षणि कर ठोकुन
झालं काम की नाही, न पुसे मृत्यू कारण!

आजतागायत चालत आलेली परंपरा म्हणजे नवस! या सामाजिक प्रथेवर सावित्रीबाई फुले जणू 'आसुड' ओढताना लिहितात...

नवस करिती। बकरू मारीन
नवस फेडीन। बाळजन्मी ।।
धोंडे मुले देती। नवसा पावती
लग्न का करती। नारी नर

'मातीची ओवी' या सुंदर, आशयघन काव्यात मातीची महती अत्यंत जिव्हाळ्याने व्यक्त केली आहे. कवयित्री फुले लिहितात...

मातीचा महिमा। सांगावा किती हा
मातीचे नाते अहा। शिवारात

सामाजिक दुर्गुणांवर सणसणीत चपराक लगावायला सावित्रीबाई मागेपुढे पाहत नाहीत. समाजात ज्या अनिष्ट चालीरीती, परंपरा किंवा दुर्गुण घर करून आहेत, त्यातही मानवप्राणी जसा चुकार, टुकार वागतो त्यावर 'तयास मानव म्हणावे का?' या रचनेत फुले पोटतिडकीने प्रकट होतात...

ज्ञान नाही विद्या नाही
ते घेणेचि गोडी नाही
बुद्धी असुनि चालत नाही
तयास मानव म्हणावे का?

बाईल काम करीत राही
ऐतोबा हा खात राही
पशू पक्षात ऐसे नाही
तयास मानव म्हणावे का?

'सावित्री व जोतिबा संवाद' या कवितेत पतीशी संवाद साधताना, महात्मा जोतिबा फुले यांनी आणि त्यांच्या मदतीने सावित्रीबाईंनी काय साध्य केले ते आदराने मांडतात...

सावित्री :
काळरात्र गेली। अज्ञान पळाले।
सर्वा जागे केले। सूर्याने या।
शूद्र या क्षितिजी । जोतिबा हा सूर्य
तेजस्वी अपूर्व । उगवला।

अशारीतीने सुमारे पावणे दोनशे वर्षांपूर्वी लिहिलेला, यावर्षी पुनर्मुद्रित केलेला, आशयगर्भ, भावगर्भ, विचारयुक्त, प्रबोधनात्मक, चिंतनशील असा थोर समाजसेविका, शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा 'काव्यफुले' हा काव्यसंग्रह वाचण्यात आला...



मनातला पाऊस!

स्वाभिमानी, करारी आणि मेहनती रायाप्पा देसाई यांना आपली वाडवडिलार्जित शेती-वाडी विजयकुमार यांनी सांभाळावी, असंच वाटत होतं. हवं तर त्यांनी शेतीशास्त्राचं शिक्षण पुरं करावं. ते आपल्या शेतीवाडीत उपयोगालाच येईल, असंच त्यांना वाटत होतं. पुण्याच्या शेतकी कॉलेजात विजयकुमार यांना प्रवेश मिळाला. बाड-बिस्तारा घेऊन ते हॉस्टेलवर राहायला गेले. त्यामुळे गाव, शेतीवाडी आणि पुणेरी शिक्षण यांच्यातील आंतर वाढत गेले. महिना-पंधरा दिवसांनी विजयकुमार गावाकडे येत असत. शेती-वाडी, घरचं कमी-जास्त पाहत. वडिलांच्या अपेक्षांचं ओझं टाळता येत नव्हतं.

रावसाहेब पुजारी

९

बाहेर वातावरण पावसाळी अन् अगदीच कुंद कुंद होतं. अधूनमधून सरी बरसत होत्या. वातावरणातला थंड वारा अंगाला झोंबू लागलेला. मात्र समोरचं हिरवंगार शिवार, रानामाळातली डोलणारी पिके मनाला मोहवत होती. दूरवरचं मोरांचं केकाटणं अधूनमधून कानावर पडू लागलेलं. संध्याकाळ रात्रीच्या दिशेने कूच करू लागलेली. मनावर कसलं तरी मळभ चढल्याची चाहूल लागलेली. रेलत्या खुर्चीतून उठून सुभाषराव पोर्चेमध्येच येरझाऱ्या घालू लागले. पाकिटातली सिगारेट काढून तोंडात धरली अन् बराच काळ ती शिलगावण्याची ते विसरून गेलेले. भानावर येत ती लायटरच्या सहाय्याने शिलगावली अन् हळूहळू तोंडातला धूर ते हवेत सोडू लागले. मधेच झुपकेदार मिश्यावरून हात फिरवत ते स्वतःशीच काहीतरी बोलत होते, काळ किती विचित्र असतो. विधीलिखितातलं काही चुकत नाही. म्हातारपण वाईटच असतं. जवानीतली मिजास इथं गळून पडते.

विजयकुमार देसाई, एसबीआयचे सेवानिवृत्त शाखाधिकारी. बँक सेवेतून निवृत्त होऊन १० वर्षे उलटलेली. वयाच्या सत्तरीकडे झुकलेले. अंगाकाठी सडपातळ शरीरयष्टी, भारदार झुपक्या मिश्या. मिश्यांमुळे व्यक्तिमत्त्वातील खानदानीपणा जाणवे. पहाडी आवाज, खळखळून हसणं. सगळंच कसं समोरच्यावर सहजपणे छाप पाडणारं. पांढरा शुभ्र पायजमा, फुल्ल बाह्याचा शर्ट

आणि त्यावर थंडीपासून बचावासाठी ऊबदार लोकरीचे स्वेटर. नेहमीचा पेहराव. डोक्यावरचे केस तुरळक आणि पांढरे झालेले. टक्कलाची व्याप्ती वाढत निघालेली. हसतमुख चेहरा आणि अनुभवाचे संचित चेहऱ्यावर ओसंडत होतं. विचारात कायम गर्क असणारं विजयकुमारांचं व्यक्तिमत्त्व म्हणजे वल्लीच. नोकरीच्या निमित्ताने अनेक गावं आणि शहरंही फिरणं झालेलं. मात्र, शेतकरी बाणा, शेतकरी खाणा ही खास ओळख.

वाडवडिलार्जित शेतीत आता त्यांची चौथी पिढी नांदत होती. मुलांच्या हाती शेतीचा सगळा पसारा होता. सेवानिवृत्तीनंतर ते मुलाला शेतीवाडीत मदत करत गावाकडं स्थायिक झालेले. रानातला तो टुमदार बंगला आणि अवती-भवती फुललेली हिरवीगार शेतीवाडी. ऊस, केळी, विविध फळबागा आणि नातवंडांचा किलबिलाट. यामुळे सुखावणारी आयुष्याची संध्याकाळ. काळजी म्हणून कशाची नव्हती.

शेताच्या बाजूने वाहणारा खळाळता ओढा. ओढ्याकाठी गर्द झाडी. जांभूळ, करवंद, तसेच करंज अशा नाना प्रकारची झाडी ओढ्याच्या दोन्ही काठावर विखुरलेली. त्यावर पक्ष्यांचा किलबिलाट. पावसाच्या आगमनाबरोबर पिसारे फुलवून नाचणारे मोर, लांडोरींचा थवा. नेत्रसुखाच्या हिरवळीवर रुळलेलं विजयकुमारांचं खुशालचेंडू व्यक्तिमत्त्व. कृतार्थ जीवनाच्या रम्य संध्याकाळी देसाईसाहेब रेलत्या खुर्चीत बसून आपल्या शेतीवाडीचा परिसर न्हाळत होते.

गेल्या चार-पाच दिवसांपासून पावसाने घातलेला धुमाकूळ अनुभवत त्यांची नजर दूरवर जात होती. बाहेर झिडझिम्माड पाऊस कोसळत होता. चार दिवसांपासून सूर्यदर्शन झालेलं नव्हतं. त्यांच्या डोळ्यासमोर पावसाचं राना-माळ्यातून खेळकर पोराप्रमाणं धावणारं तांबडं पाणी इकडं-तिकडं वेगावताना नजरेत भरत होतं. त्याचा सखल भागाकडचा ओढा वाढलेला. शिवारात शेळ्या-मेंढ्या, गुरं-ढोरं, गाई-म्हशी भरपावसाला तोंड देत अंग चोरून हिरव्या चाऱ्याचा मनमुराद आस्वाद घेत होत्या. त्यांच्या खुरांच्या पाऊलखुणा मातीच्या रस्त्यावर ठळकपणे दिसत होत्या. जनावरांच्या पायदानाने रस्त्यावर चिखलाचं साम्राज्य पसरलेलं.

बँकिंगमध्ये मुरलेल्या विजयकुमारांना बँकेतील पासबुकातील फूटप्रिंटप्रमाणे त्यांच्या नोंदी त्या रस्त्यावर जाणवत होत्या. रानाच्या ताली पावसाच्या पाण्याने टमटमलेल्या. हिरवं शिवार सततच्या पावसाने गारठलं होतं. रानातलं पशु-पक्ष्याचं विश्व आडोशा-आडोशाने भिजक्या पावसाला सामोरं जात होतं. पक्ष्यांनी त्यांची घरटी आबादानी केलेली. मोर-लांडोरीनं झाडोऱ्याचा आधार घेतलेला अन् ससे बिळातून बाहेर यायला तयार नव्हते. भुरल्या आडोशाच्या कोरड्या मातीत अंग खुसपून निवांत झालेल्या. भिजलेली माणसं ऊबदार आडोशाचा आधार शोध घेत होती. कोणी प्लास्टिक कागदाच्या खोळी केल्या होत्या. कोणी धनगरी घोंगड्याच्या खोळीत अंगाला ऊबदारपणे लपेटलेलं. आणि त्याच वेळी विजयकुमार यांच्या डोळ्यासमोर आपल्या बँकेतील सेवेचा ४० वर्षांचा कार्यकाल एकेक पानं करीत उघडत निघालेला. बंगल्याच्या पन्हाळ्यातून पडणाऱ्या पावसाच्या धारांबरोबर त्यांच्या डोळ्यांसमोर बँकेतील बरे-वाईट अनेक प्रसंग डोळ्यांसमोर तरळत होते. जणु एखादा चित्रपट समोरून सरकत राहावा, असं त्यांचं झालेलं. प्रामाणिक सेवेचा अभिमान त्यांच्या ठायी भरून वाहत होता. कृतार्थतेचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर चमकत होता.

देसाईसाहेबांचं गाव धड खेडंही नव्हतं आणि शहरही नव्हतं. पण तालुक्याचं मोठं गाव असावं, तसंच होतं. रग्गड लोकसंख्या, दाटीवाटीची घरं. परिवर्तनाचं साज-शृंगार ल्यालेलं. रायप्पा देसाई यांचे ते एकुलते चिरंजीव. वीस एकरांचा शेतमळा रायप्पा देसाईंची दौलत. गावात टोलेजंग देसाईवाडा. दगडी भिंती, ऐसपैस अंगण. सोप्यात बैठकीची व्यवस्था. त्यात टाकलेलं लोड-तक्के, सगळं कसं खानदानी. रायप्पाण्णा गावातील बडी असामी. मनाने अतिशय दिलदार.

हत्तीसारख्या दोन बैलजोड्या, ट्रॅक्टरसहित सगळी शेती अवजारे अंगणात पहुडलेली. जनावरांचा गोठा गाई-गुरांनी भरलेला. घरात दूधदुभत्याची लयलूट. राबत्या माणसांचा मोठा गोतावळा. रायप्पांच्या सोबतीला उघडी जीप ऐटीत दारात उभी. ती केवळ एक जीप नव्हती,

तर रायाप्पा देसाईंच्या ऐश्वराचा दिमाखदार ऐवज होता. रायप्पा देसाईंचा तोच आब विजयकुमारांना मिळालेला. त्यात विजयकुमार यांचे शिक्षण सुरू झाले. दहावी-बारावी गावातल्या शाळेतच ते चांगल्या गुणाने उत्तीर्ण होत गेले. बापाला पोराच्या हुशारीचा दांडगा अभिमान. बारावीनंतर पुढे काय? हा विजयकुमार आणि रायाप्पा दोघा बाप-लेकांच्यासमोर प्रश्न. विजयकुमारच्या आई हौसाक्कांना तो काही प्रश्न पडला नव्हता. शिक्षणाचे बाप-ल्योक बघून घेतील, असे तिचे मत. आपल्याला काही कुठं कळतं शिक्षणातलं, अशी तिची समजूत. पण पोरानं चांगलं शिकावं, घराण्याचं नाव मोठं करावं, असं त्या माऊलीला खचितच वाटत होतं.

स्वाभिमानी, करारी आणि मेहनती रायाप्पा देसाई यांना आपली वाडवडिलार्जित शेती-वाडी विजयकुमार यांनी सांभाळावी, असंच वाटत होतं. हवं तर त्यांनी शेतीशास्त्राचं शिक्षण पुरं करावं. ते आपल्या शेतीवाडीत उपयोगालाच येईल, असंच त्यांना वाटत होतं. पुण्याच्या शेतकी कॉलेजात विजयकुमार यांना प्रवेश मिळाला. बाड-बिस्तारा घेऊन ते हॉस्टेलवर राहायला गेले. त्यामुळे गाव, शेतीवाडी आणि पुणेरी शिक्षण यांच्यातील आंतर वाढत गेले. महिना-पंधरा दिवसांनी विजयकुमार गावाकडे येत असत. शेती-वाडी, घरचं कमी-जास्त पाहत. वडिलांच्या अपेक्षांचं ओझं टाळता येत नव्हतं. पण ते पेलताना दमछाकही होत होती. परीक्षांच्या काळात तेही होत नव्हतं. शिक्षणाचा चार वर्षांचा कालावधी कधी संपला हे त्यांचं त्यांनाच कळलंच नाही.

परीक्षा संपता संपताच कॉलेजमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यू झाले. अनेक सरकारी संस्था, खासगी व्यवस्थापन, बँकांनी यामध्ये भाग घेतला. त्यात एस.बी.आय. या सरकारी बँकेच्या शेती अधिकारीपदासाठी विजयकुमार यांची निवड झाली. ही वार्ता विजयकुमारसाठी सुखावणारी होती. मात्र, रायप्पांना नोकरी-बिकरीचे काही पटलं नव्हतं. तरीही विजयकुमारनी त्यांना ते पटवलं. नोकरी सांभाळून शेतीवाडी सांभाळीन याची हमी दिली. तेव्हा रायप्पांनी त्याला होकार दिला.

एसबीआय म्हणजे देशाची लीड बँक. बँकांची बँक असा तिचा बँकिंग क्षेत्रातील रुबाब आणि दबदबा. एसबीआयची नोकरी म्हणजे काही औरच होतं. लोकांच्या तिथल्या स्टाफकडे बघण्याचा दृष्टिकोन, सेवेत अनेक सेवा-सुविधा. सेवानिवृत्तीनंतर पेन्शनची सोय. त्यात शाखाधिकारी म्हणजे म्हणेल ती पूर्वदिशा.

नुकतेच इंदिराबाईंनी अनेक खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केलेलं. बँकिंग सुविधा लोकांना सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासन प्रयत्न करीत होतं. त्यात एसबीआयची अधिकारीपदाची नोकरी विजयकुमार यांच्यासाठी आव्हान होतं. त्यांच्या अंगावर अनेक जबाबदाऱ्या येत गेल्या. यातून ते कृषि अधिकाऱ्याचे शाखाधिकारी झाले. त्याकाळी आसपासच्या १०-१५ गावांत बँक नसायची. त्यामुळे बँकेकडं मोठा परगाणा होता. ती नोकरी म्हणजे एक जहागिरीच मोठ्या पगारीची. दिमतीला नोकर, हाताखाली मोठा कर्मचारी वर्ग, भेटायला येणाऱ्यांची संख्या मोठी. आपले काम लोकांच्या उपयोगाला येतंय, याचं मोठे समाधान. यामुळे बँकिंग सोडून इतर काही करायला त्यांना फुरसतच नव्हती.

सुरुवातीचा बँकिंग व्यवसायातील काळ फारच कठीण होता. ती आडवी लेजर्स, प्रत्येक इंटरी मॅन्युअली. सगळा वेळखाऊ कारभार. त्यात बँकेच्या दारात ग्राहकांच्या रांगाच रांगा. त्या गर्दीत अनेक प्रकारचे लोक असत. त्यात सगळा सरकारी भरणा एसबीआयमध्ये होत असल्याने सकाळी लवकर सुरू झालेली ड्युटी रात्री उशिरापर्यंत सगळं ज्या त्या दिवशी टॅली झाल्याशिवाय संपत नव्हती. एसबीआय म्हणजे बँक ऑफ बँकर्स. जिल्हा बँका, ग्रामीण बँका, खासगी बँका, को-आपरेटिव्ह बँका, पतसंस्था, सेवा सोसायट्यांना एसबीआयकडेच यावं लागत होतं. सरकारी नोकरांचे सगळे पगार इथंच होत. केंद्राचे, राज्याचे सगळे सरकारी फंड एसबीआयमध्ये येत. रोज बँकेत कोट्यवधींचा भरणा आणि तितकाच विड्रॉवल. शाखाधिकारी म्हणून स्टाफवर बारीक लक्ष ठेवावं लागे. उद्योजकांचे, व्यापाऱ्यांचे मोठे भरणे. त्यांचे लोक पैशांच्या बॅगा भरून नोटा घेऊन बँकेत येत. कॅशियर आणि इतर स्टाफकडून या सगळ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागे. त्यात बँकिंग म्हणजे प्रत्येक

गोष्टीची फुटप्रिंट निघे. बँकेतून काढलेल्या पैशाची, भरलेल्या रकमेची, त्यावर आकारलेल्या चार्जेसची, त्यावर आकारलेल्या व्याजाची सगळ्याची फुटप्रिंट निघे. ग्राहकांच्या बँकेच्या पासबुकमध्ये हे सगळे प्रतिबिंबित होत. साहजिकच सगळं डोळ्यांत तेल घालून पाहावं लागत होतं.

या सगळ्यात घबाडात विजयकुमार यांची इच्छा असूनही शेतीवाडीकडे दुर्लक्ष होत होतं. मात्र, वेळ मिळेल तेव्हा वडिलांशी सल्ला-मसलत, शेतीकडे फेरफटका चुकत नव्हता. मात्र ते आता बांधावरचे शेतकरी झालेले.

बँकिंग व्यवसायात अलीकडं अनेक सॉफ्टवेअर आल्याने अनेक कामं सहज, सुलभ आणि जलद झालेली आहेत. मात्र एकेकाळी प्रत्येक गोष्ट हातानं लिहावी लागत. ती आडवी रजिस्ट्रर भरून घ्यावी लागत. बँकेची पासबुक भरताना हात मेटाकुटीला येत. लोकांच्या हातात पैसा खेळू लागला तसा बँकांचे व्यवहार वाढले. डोळे दिपावेत असा पैसा बँकेत भरणा होऊ लागला. तितकाच तो बँकेतून सहजरीत्या काढला जाऊ लागला. अनेकदा बँकिंगच्या व्यवहारात मिस-मॅच होत होते. कुणाचं तरी 'आरटीजीएस' भलत्याच अकाऊंटला क्रेडिट झालेलं असे. चुकून कोणाचा तरी भरणा भलतीकडे जमा होतो. ह्या चुका वेळीच दुरूस्त झाल्या नाही तर भलतेच त्रांगडे होऊन बसते. ती रक्कम पुन्हा वळती करून घेताना नाकीनऊ येते. बँकिंग व्यवहारात पैसा हा मध्यवर्ती असतो. यासाठी चूक झाली तर लोक भांडायला येतात. बँकेची विश्वासार्हता पणाला लागते. खालच्या स्टाफच्या चुका बऱ्याचदा शाखाधिकाऱ्यांनाच निस्तराव्या लागत. ग्राहकांची समजूत घालताना अवघड होऊन जात. लोकांची अडचण असते, तेव्हा दिनवाणी चेहरे घेऊन येतात. संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी, सेवानिवृत्तीच्या पेशन्स, विधवा महिलांच्या पेन्शनसाठी अनेकजण बँकेत हेलपाटे मारत असतात. सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार, त्या सगळ्याला सामोरे जात शाखाधिकारी विजयकुमार यांचे दिवस बहरत निघाले होते. शाखाधिकारी कसा असावा, यादृष्टीने लोक, इतर बँकर्स, तसेच इतर शाखाधिकारी, बँकेचे वरिष्ठसुद्धा विजयकुमार यांच्याकडे पाहत होते. कार्यतत्परता ही त्यांची खासीयत झाली होती. लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या.

इकडे हौसाक्कांनी रायप्पा देसाई यांच्याकडे विजयकुमार यांच्या लग्नाचा तगादा लावलेला. अनेक तालेवार स्थळं विजयकुमार यांच्यासाठी चालून येत होती. भरपूर शेतीवाडी, एसबीआयमधील मोठ्या पदावरची नोकरी यामुळे अनेक मंडळी त्यांच्यासाठी पायघड्या घालत होती. मात्र विजयकुमारकडूनच चालढकल सुरू होती.

अखेर तांदूळवाडीच्या माने-पाटलांची मुलगी कांचन, रायप्पा देसाईंना पसंत पडली. विजयकुमार यांचे लग्न गावात अगदी थाटामाटात झाले. सगळा गाव, गोतावळा आशीर्वादाला हजर होता. हळूहळू त्यांचा वेल चढत गेला. विजयकुमार यांना दोन मुलगे. वार्धक्यामुळे रायप्पा देसाई देववासी झाले. शेतीवाडीची सगळी जबाबदारी विजयकुमार यांची आई हौसाक्का, पत्नी कांचन सांभाळत होत्या. अधेमधे येऊन विजयकुमार त्यांना मदत करत होते. दिमतीला नोकर-चाकर होतेच. सगळं कसं सुरळीत सुरू होतं.

बँकेतील नोकरी ही काटेरी मुकुटचं असतो. डोक्यावर घातला की तो दुसऱ्यांना फार छान दिसतो. पण तो निभावताना मोठी कसरत असते. अनेक प्रकारचे लोक रोज भेटतात. कोणी आमिष दाखवतो, कोणी सहानुभूती दाखवतो. कोणी कामापुरते वापरून घेतो. मन हळवे असेल तर दीन-दुबळ्यांची कणव येत राहते. प्रसंगी कठोर व्हावे लागते. ग्राहकाला दुखावून चालत नसते. ठेवीदारांचे नखरे तर आणखी वेगळेच. नव्या ठेवी मिळविताना अनेक कसरती कराव्या लागतात. त्यांना होईल तेवढी मदत केली जात. पण काही-काही प्रसंग अतिशय बाके असतात. तिथं तुमची परीक्षा घेतली जाते. विजयकुमार अशा अनेक अनुभवातून तावून-सुलाखून गेलेले. त्यांच्या आयुष्याच्या पासबुकावर या नोंद झालेल्या होत्या. त्याची आठवण होताना ते सगळं डोळ्यांसमोर उभे राहते अन् देसाईसाहेब भावुक होतात.

एकदा १० कोटींची आरटीजीएसची रक्कम चुकून भलत्याच खात्यावर गेली. पार्टीकडून चार-आठ दिवस काहीच विचारपूस, चौकशी झाली नाही. ही चूक

बँकेच्याही लक्षात आली नाही. ज्याच्या खात्यावर पैसे जमा झाले होते, त्यांनी त्यातील काही रक्कम उचलली होती. बँकेसमोर भलताच प्रसंग उभा होता. ही रक्कम वसूल करताना अनेक गोष्टी बँकेला सहन कराव्या लागल्या. तसेच अनेक प्रामाणिक लोक चुकून आलेले पैसे संबंधिताकडे परत आणून देत. त्यांचा गौरव केला जातो. त्या दिवशी बँक प्रमुखाला निवांत झोप येत. असे नाना प्रसंग त्यांना आठवत होते.

अनेक बडे राजकीय पुढारी आपल्या सग्या-सोयऱ्यांच्यासाठी कर्जमंजुरीसाठी आग्रह धरत होते. त्यांना टाळता येत नव्हतं. तत्त्वाला मुरड घालून कामं हातावेगळी करावी लागत होती. सरकारी बँकेतील कर्जवसुली हा एक दिव्य टास्क. प्रसंगी कर्जदाराच्या दारात जाऊन बसावं लागे. कर्ज घेतानाची आगतिका आणि कर्ज फेडतानाची मग्रुरी यामध्ये बँकेच्या कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागी. अशा अनेक दिव्यातून त्यांना जावेच लागतं. प्रसंगी मानहानी. अनेकदा हातघाईचे प्रसंग. मनातला राग, तगमग उघड करता येत नाही. तोंड दाबून बुक्क्यांचा मार.

एकदा विजयकुमार यांच्या केबिनमध्ये एक पंचवीस-तिशीतील गोरी-गोमटी स्त्री प्रकटली. डोक्यावर गॉगल आडकवलेला. तिचे पती दुबईला असतात. त्यांनी काही दिवसांपूर्वी पाच लाख रुपये तिच्या खात्यावर वर्ग केलेले. मात्र, ती रक्कम इकडे तिच्या खात्यात जमाच झाली नव्हती. ते खातं हॅक करून कोणी तरी ती रक्कम हडप केलेली. बाई भलत्याच रागात होत्या. बँकिंग व्यवस्थेविषयी अविश्वास व्यक्त करू लागलेल्या. याबाबत सायबर गुन्हा नोंदवला गेला. त्यातून त्या स्त्रीचे पैसे कसे परत मिळतील, याची सगळ्यांना चिंता होती. सायबर पोलिसांच्या मदतीने ती रक्कम वसूल करण्यात पोलिसाना यश आलं होतं. दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी ती स्त्री पुन्हा बँकेत आली. विजयकुमार कामात व्यस्त असताना ती केबीनमध्ये घुसली. तिच्या हातात गुलाबाच्या फुलांचा गुच्छ आणि मिठाईचा बॉक्स. स्मितहास्याने ती गुलाबाचा गुच्छ देऊन विजयकुमार यांचे आभार मानत होती.

बँकेच्या चुकीमुळे तिचा रागीटलेला आणि पैसे परत मिळाल्याने आजचा हसरा चेहरा बघून विजयकुमार यांना गंमत वाटत होती. त्यांनी तिला कॉफीचा आग्रह केला. ती त्यांच्यासमोर बसून ताहानलेल्या हरणीसारखी अंगप्रदर्शन करीत होती. ही गोष्ट विजयकुमार यांच्या नजरेतून सुटली नव्हती. तिच्या कन्चुकीच्या निळ्या पट्या तिच्या गोऱ्यागोमट्या खांद्यावर अंगवस्त्रातून बाहेर आलेल्या ठळकपणे दिसत होत्या. ओठांची हालचाल काही वेगळंच सुचवित होती. कॉफीचा एकेक घोट घेता घेता ती अधिकच मोकळी होत होती. अन् पुढच्या क्षणी तिने विजयकुमारना घरी जेवायला यायचा आग्रह सुरू केला. अशा मोहाच्या क्षणाचे फूटप्रिंट त्यांच्या आयुष्याच्या पासबुकवर उमटत गेले होते. ती म्हणत होती, बँकेचे लोक, तुम्ही काहीही करू शकता. आपली सेवा करण्याची संधी द्या ना, असं तिला सुचवायचे होतं. यातून सुटका करून घेत त्यांनी तिला टाळले होतं. हा प्रसंग आज त्यांच्यासमोर जशाच्या तसा उभा होता.

अशा अनेक बऱ्या-वाईट अनुभवाचे गाठोडं घेऊन एसबीआयमधील ४० वर्षांची सेवा पूर्ण करून विजयकुमार दहा वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनिमित्त अनेकांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी अनेक संस्थात्मक कामाना मदत केली होती. अनेकांच्या चेहऱ्यावरचं हास्य फुलविलं होतं. त्यामुळे कृतार्थ संध्याकाळी त्यांच्या मनाला खूप समाधान वाटत होतं. त्यांची मुलं आता मोठी झालेली. त्यांची लग्नं झाली. नातवंडं घरात खेळू

सरसरता साहित्य पत्रिकेसाठी लिहिते व्हा...

आपल्या कथा, कविता, ललित निबंध, प्रवास वर्णन इ. साहित्य समरसता साहित्य पत्रिकेत प्रकाशित करू शकता. आपले साहित्य संपादक समरसता साहित्य पत्रिका १/६ जैन इस्टेट, विलेज रोड, भांडूप (प.), मुंबई - ७८ या पत्त्यावर पाठवावे.

लागली. रानातील टुमदार बंगल्यात विजयकुमार निवांत आयुष्याची संध्याकाळ व्यतीत करीत होते. कोणी सल्ला विचारायला, त्यांना मार्गदर्शन करत. अनेकजण भेटायला त्यांच्याकडे येत. पण वर्दळ, घाई, गडबड, कामाचा गोंगाट असं काही नव्हतं. मनावर फारसं दडपणही नव्हतं. ते आता मनाचे राजे होते.

गेल्या पाच-सहा दिवसांपासून पावसानं कहर केला होता. सूर्यदर्शन झालेलं नव्हतं. त्यापेक्षा रोज सकाळ-संध्याकाळी फिरायला जाण्यात खंड पडल्यानं विजयकुमार आज जास्तच अस्वस्थ होते. फिरणं होत नसल्यानं त्यांच्या मनाची चिडचिड वाढलेली. बंगल्याच्या पहिल्या मजल्यावरून त्यांची सगळी शेतीवाडी न्याहाळता येत होती. पण पाठीशी दोन्ही हात पकडून तिथंल्या तिथंच येरझाऱ्या मारीत होते. गारठलेल्या वातावरणात बायको, सुनांकडून गरम-गरम चहा, कुरकुरीत भजी असं त्यांच्या हातात येत होतं. तरीही पावसाच्या उच्छादाने त्यांचं मन सैरभैरं झालं होतं. मनाला बेचैनी जाणवत होती. मनाच्या कोपऱ्या-कोपऱ्यात काहीतरी कोंदटल्यासारखं झालेलं होतं. मुक्त हवेत चार पावले चालली पाहिजेत, असं त्यांना वाटत होतं. पण झड पावसाने त्यांचा नाइलाज केला होता.

विजयकुमार बँकेतून सेवानिवृत्त झाल्यापासून त्यांना पहिल्यांदाच आज एकटे-एकटे वाटू लागलेलं होतं. घराबाहेर कोसळत असलेल्या पावसाने त्यांच्या मनात वेगळंच घर केलेलं होतं. मनावर दाटलेलं मळभ लवकर दूर व्हावं, असं त्यांना वाटू लागलं होतं.

बँकेतील ती गर्दी, कॅशियरसमोरच्या रांगा, शासकीय लाभार्थींचे दीनवाणं चेहरे, इतर बँकांच्या प्रतिनिधींचे नमस्कार या सगळ्यापासून ते आता दूर होते. गेल्या दहा वर्षांत मुलग्याच्या शेतीवाडीतील टुमदार बंगल्यात आयुष्याची संध्याकाळ ते निवांतपणे जगत होते. काही मित्र संध्याकाळी मळ्यातून फेरफटका मारण्यासाठी, गप्पाटांक करायला यायचे. त्यांच्यासमवेत चहा-पाणी, चर्चांचे फड रंगत. पण पाच-सहा दिवसाच्या झिडझिम्मड पावसानं त्यांना दिवसभर खुर्चीला खिळवून ठेवलं होतं. मोकळ्या हवेतील श्वास घेता येत नव्हता.

पाऊस हा बँकेतील पैशासारखाच असतो. तो कधी कोठे कसा बरसेल हे सांगता येत नाही. तो रानावनातून, शेतीवाडीतून, ओढ्या-नाल्यातून, नदी पात्रातून वाहत पुढं पुढं सरकत असतो. त्याचा खळखळाट असतो. त्याचा असा वेगळा हंगाम असतो. त्या काळात तो बरसत राहतो. लोकांच्या मनात घर करून राहतो. पण जिथं तो पडतो, त्याची फूटप्रिंट मात्र निघत नाही. या पावसाला पकडता आले पाहिजे. तो बचत खात्यात, चालू खात्यात जमा करून ठेवता आला पाहिजे. हे आपण लोकांना शिकविले पाहिजे. याबाबतची लोकजागृती झाली पाहिजे. थेंबे थेंबे तळे साचे, असं बँकेतल्या बचतीसारखं पावसाचं झालं पाहिजे. पुन्हा गरजेप्रमाणे तो वापरता आला पाहिजे. तो काळा की गोरा याचा भेद न करता त्याला आपलंसं करता आलं पाहिजे. पाऊस आणि बँकिंग यांच्यामध्ये फरक असा काय हो? असे नाना विचार आज विजयकुमार यांच्या मनाला शिवून जात होते. बाहेर पडणारा सारा पाऊस ते एकूण बँकिंग सिस्टिम्सशी जोडू पाहत होते. एका बँकर्सच्या मनातला तो पाऊस होता.

पावसाच्या बरसण्याबरोबर त्यांच्या मनावर कसलं तरी ओझं वाढलं होतं. ते यापूर्वी कधीच त्यांच्या मनावर आक्रसलेलं नव्हतं. तरीही बाहेर पडणारा पाऊस त्यांच्या मनावर गुंजी घालू लागला होता. बँकेतील पैशाप्रमाणे तो सृष्टीला नवसंजीवनी देत असतो. तो दाता असतो, तो नवीन घडविण्याचे काम करतो. त्याचं असणं फारच महत्त्वाचे आहे. तरी तो मनावर ओझं का होतो आहे, याची चिंता विजयकुमार यांच्या मनाला लागून राहिलेली असते. पावसाबरोबर येणाऱ्या थंड वाऱ्यानं त्यांच्या मनाचं कोपरे खुले होत होते. मनातला पावसाचा हा खेळ विजयकुमार यांना अस्वस्थ करीत राहतो. याचं त्यांना कोडे पडलेलं असतं. आणि एका जनजागृतीच्या मोहिमेचा आरंभबिंदू त्या क्षणापासून सुरू होतो.



चालविशी हाती

पुस्तकात शब्दबद्ध केलेला एकूण प्रवास सहज साध्य नाही हे त्यातून लक्षात येते. तरीही गेली बेचाळीस वर्षे हे कसे केले असेल अशी उत्सुकता लागून राहतेच. गीताताई सांगते की, तिचा स्वभाव भूतकाळात रमणारा, रेंगाळणारा नाही. असे असतानाही त्याकाळातील सगळे संदर्भ ज्या तपशिलाने समोर येतात त्यावरून हे लक्षात येते की, केलेले काम किंवा स्वीकारलेली जबाबदारी ही मनापासून आणि ध्येयपूर्तीच्या दिशेने जाण्याचे आश्वासक पाऊल म्हणून खांद्यावर घेतली आहे.

सुहास वैद्य

९९२२९१५२५४

गीताताई गुंडेंच्या सामजिक कार्याच्या प्रवासाविषयी असल्याने एका प्रवासात ते वाचण्याचा योग आला. पुस्तक वाचून हातावेगळं केलं असं म्हणायचा प्रघात आहे, पण या पुस्तकाच्या बाबतीत तो प्रघातच मी बाजूला ठेवला.

गीताताई या नावाशी माझे विद्यार्थी परिषद म्हणून काही वेगळे नाते आहे. ताईंच्या 'अभाविप'चे पूर्णवेळ काम करण्याच्या निर्णयाची रीतसर घोषणा १९८४ साली झालेल्या ज्या १८ व्या महाराष्ट्र प्रदेश (शासकीय महाराष्ट्र, विदर्भ सोडून) अधिवेशनात झाली. त्या ठिकाणी मी उपस्थित होतो. त्यावेळी ग्लाक्सोसारखी कंपनी सोडून 'अभाविप'चे पूर्णवेळ काम करणारी ही गीता कोण? याचे वेगळेच औत्सुक्य होते. आज बेचाळीस वर्षांनंतरही ते औत्सुक्य कायम आहे.

गीताताईच्या पुस्तकाचे प्रकाशन होऊन पाच महिने उलटून गेले. पुस्तकाची छापाई आणि तत्पूर्वीचे सोपस्कार कदाचित महिना-दीड महिन्यात संपले असतील पण, हा सर्व प्रवास प्रत्यक्ष गीताताईला बोलते करून तिच्या शब्दात ऐकून लिहून घेणे ही वेगळीच तपःसाधना आहे. डॉ. ज्योती पटवर्धन आणि डॉ. पद्मा सहस्रबुद्धे साठे यांनी ती साधना साधली आहे. गीताताई स्वतःविषयी फार बोलणारी नाही. त्या अर्थाने ती अबोल आहे. पण तिच्या कामाचा आवाका आणि परीघ अनेक सामाजिक आयामांना गवसणी घालणारा आहे. पुस्तकात गीताताईने

सांगितलेल्या आठवणी किंवा अनुभव हे तिला मिळालेल्या दायीत्वाला मध्यवर्ती ठेवून ठळकपणे मांडलेल्या आहेत. त्यामुळे या पुस्तकात शब्दांकनाच्या आधाराने येणारे गीताताईचे उल्लेख हे ताईच्या स्वभावाचे वैशिष्ट्य अधोरेखित करते.



मुळातच या पुस्तकाचे निमंत्रण हाती पडले तेव्हाच हे लक्षात आले होते. कारण त्यात असे आवर्जून नमूद केले होते, हे गीताताईचे आत्मवृत्त नाही, तर कार्यवृत्त आहे. त्यामुळे यामध्ये येणारे सर्व विषय म्हणजे आसपासच्या परिस्थितीतून मनात उमटणाऱ्या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा हा प्रवास आहे. त्याला सहवेदनेचे भान आहे. संवेदनशील मनाची जोड आहे आणि प्रश्नांची उत्तरं शोधण्याची जिगिषा आहे. सामान्यपणे सामाजिक काम करण्याची कोणती तरी प्रेरणा, ऊर्जा, प्रभाव असतो गीताताईने या सगळ्याला अंतर देऊन कार्यनिर्मिती केली. सुरुवातीला हे समजायला थोडं अवघड जातं. पण जेव्हा पुस्तकातून गीताताईचे अंतरंग उलगडत जातात तेव्हा यामागचे कोडे सुटत जाते.

पुस्तकात शब्दबद्ध केलेला एकूण प्रवास सहज साध्य नाही हे त्यातून लक्षात येते. तरीही गेली बेचाळीस वर्षे हे कसे केले असेल अशी उत्सुकता लागून राहतेच. गीताताई सांगते की, तिचा स्वभाव भूतकाळात रमणारा, रेंगाळणारा नाही. असे असतानाही त्याकाळातील सगळे संदर्भ ज्या तपशिलाने समोर येतात त्यावरून हे लक्षात येते की, केलेले काम किंवा स्वीकारलेली जबाबदारी ही मनापासून आणि ध्येयपूर्तीच्या दिशेने जाण्याचे आश्वासक पाऊल म्हणून खांद्यावर घेतली आहे.

आपल्या तत्त्वांना मुरड न घालता हाती घेतलेल्या कार्याला निर्णायक स्थितीत आणण्याचे वेगळेच कौशल्य गीताताईंच्या कार्यशैलीत दिसून येते. त्यासंदर्भात त्या एक आठवण सांगतात. १९७८ मध्ये प. पु. सरसंघचालक बाळसाहेब देवरस यांचे दादरमध्ये बौद्धिक होणार होते आणि मा. आबाजी थत्ते यांनी गीताताईला 'संध्याकाळी ये कार्यक्रमाला' असा निरोप दिला तेव्हा गीताताईने स्पष्टपणे सांगितले, यायची इच्छा आहे, पण तिथे महिलांना बोलावले नाही आणि यायलाही सांगितले नाही. शिवाय तिथे त्यांना सन्मानाने बसण्याची कोणतीच व्यवस्था नाही. गीताताईच्या स्पष्ट बोलण्याचा परिणाम म्हणजे त्या ठिकाणी महिलांना बसण्याची चांगली व्यवस्था झालेली होती.

घरी वडील संघाचे स्वयंसेवक, संघचालक राहिलेले. मामा श्री. चंद्रकांत हरकरे आजीवन प्रचारक. त्यामुळे घरी संघ स्वयंसेवकांचा राबता. यासगळ्या वातावरणात गीताताईचे सामाजिक मन अधिकाधिक दृढ होत गेले. वैवाहिक जीवन स्वीकारले तर ज्या मानसिकतेत आपल्याला काम करायचे आहे, त्याला काही बंधने येतील याची खुणगाठ पक्की करून तिने ठरवून तिकडे न जाण्याचा निर्णय घेतला. ज्या काळात पूर्णवेळ काम करायचे ठरवले. त्यावेळी मुलींनी आपले घरदार सोडून या पद्धतीने काम करणे समाजमान्य होणारे नव्हते. असे असतानाही जेव्हा गीताताई विद्यार्थी संघटनेचे काम करण्याचा विचार करते तेव्हा ती सांगते, मी त्यावेळी अभाविपचे अर्ध्वयू मा. यशवंतराव केळकर यांच्याशी विचारविनिमय केला आणि त्यांनी व्यवस्थित समजावून सांगितले की, तू पूर्णवेळ काम करायला हरकत नाही, पण आज तशी समाजिक स्थिती नाही. लोकांच्या मनात असेही येऊ शकते की, बाकी काही जमले नाही किंवा विवाह होत नाही म्हणून हे पूर्णवेळ काम करण्याचे सुचले आहे. त्यामुळे घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करून नोकरीची संधी आली असेल तर ती संधी सोडू नये. कुणा व्यक्तीच्या प्रभावाखाली व्यक्तिगत निर्णय न घेणारी गीताताई इथे संघटन शरणता सिद्ध करते आणि सामाजिक कार्याच्या संधीची वाट पाहात ग्लाक्सो कंपनीत नोकरी करायला सुरुवात करते. अर्थात तिथेही महिला आणि त्यांच्या अधिकाराविषयी

जागरूक राहून त्यांनाही योग्य बढती, पारिश्रमिक मिळावे यासाठी सजग राहते.

सार्वजनिक जीवनात तिच्या कार्याची व्याप्ती इतकी वाढली आहे की, तुलनेने अभाविप या छोट्या वर्तुळातून संघ परिवार क्षेत्रातील महिला समन्वय विषयाचा आयाम विकसित होत गेला आणि आज त्याला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. या सगळ्या प्रवासाचा लेखाजोखा आपल्याला या पुस्तकात वाचायला मिळतो.

हा सगळा प्रवास शब्दबद्ध करत असताना गीताताई स्वतःबद्दल अत्यंत संकोचाने सर्व नोंद करताना जाणवते, पण ज्यावेळी तिच्या बरोबर काम करणाऱ्या प्रमिलाताई मेढे, आशा लकडा, पंकजा, रेखा राजे, लता, बकुलाताई देवकुळे, सुशीलाताई महाजन, सुनीता हळदेकर, माया सिंग, शोभनाताई रानडे, स्मृती इराणी अशा अनेक महिला कार्यकर्तींचा उल्लेख मात्र अत्यंत आदरयुक्त करते. वृंदावनाच्या कार्यक्रमात हेमामालिनीने किती छान भाषण केले किंवा तिथे दिली गेलेली शाल ज्यावर मोरपीस आणि बासरी रेखांकित केली होती ती सर्वांना व्यवस्थित दिसावी म्हणून हेमामालिनीने त्या शालीची घातलेली घडी किती आकर्षक होती याचीही आवर्जून दखल घेते.



मागे वळून पाहताना, गीताताई आपल्या बंधूंचा आणि उज्वल वहिनींचा उल्लेख करते आणि सहजपणे सांगून जाते की, त्यांच्या खंबीर पाठिंब्यामुळे मी माझ्या मनात असलेल्या कामाला काही न्याय देऊ शकले. किती गोड असेल ते नाते... उज्वल वाहिनी घरी आलेल्या गीताताईला आवर्जून विचारते, कुठून प्रवास करून आलीस, दक्षिणेकडून का? मग आज नाश्त्यात इडली, डोसा नाही किंवा उत्तरेकडून प्रवास करून आली असशील तर पराठा वगैरे नको.

गीताताईच्या अनुभव सिद्धतेची मांडणी करायचीच झाली तर हा श्लोक मनात रुंजी घालून जातो.

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।
निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी ।।

जी व्यक्ती कोणाचाही द्वेष करत नाही, सर्वांप्रती मैत्री दयाभाव ठेवते. जी आसक्ती आणि अहंकारापासून दूर असून सुख आणि दुःख यामध्ये समभाव ठेवते, जी क्षमाशील आहे ती व्यक्ती कृष्णाची अतीप्रिय भक्त आहे.

पुस्तकाचा शेवटचा परिच्छेद वाचून संपल्यावर जाणवते की, अजून बरंच काही अपूर्ण आहे. सवाशे दीडशे पानांत हा प्रवास सामावणारा नाही. त्याला खंडाचे स्वरूप मिळाले पाहिजे किंवा भाग १ ते १० वगैरे असले पाहिजे. तरीही गीताताईच्या अनुभवांना अक्षररूप देणाऱ्या डॉ. ज्योती पटवर्धन आणि डॉ. पद्मा सहस्रबुद्धे साठे यांचे मनापासून आभार आणि त्याला संपादित करून पुस्तकरूपाने सर्वांसमोर आणणाऱ्या श्री. सुधीर जोगळेकर यांचे मनापासून आभार. कारण इथे फक्त कुणा एका कार्यकर्तीच्या सामाजिक कार्याचा आलेख मांडलेला नाही. तर तो सार्वजनिक जीवनाचे वास्तव दर्शवणारा अनुभवपट आहे. तो जितका विस्तृत होईल तितका असे काम करणाऱ्या आणि करू इच्छिणाऱ्या अनेक भगिनींसाठी आणि काही प्रमाणात बंधूंसाठी फक्त गीता गुंडेचा नाही तर श्रीमद्भगवत गीतेच्या तोडीचा पथदर्शक वारसा ठरू शकेल.



विनाशपर्व : एका वैचारिक युद्धाचा प्रारंभ

कादंबरी वाचताना लेखिकेवरील आंबेडकरी विचार आणि बुद्ध तत्त्वज्ञानाचा असलेला प्रभाव वारंवार जाणवतो. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला मूलमंत्र विसरून एखादी व्यक्ती जेव्हा अनिष्ट रूढी, परंपरा, देवभोळेपणा, कर्मकांड या गोष्टींच्या आहारी जाते तेव्हा तिची मती भ्रष्ट होऊन ती स्वतः च्या विनाशास स्वत:च कारणीभूत ठरू शकते. यावर श्रीरंगच्या माध्यमातून लेखिकेने जळजळीत भाष्य केले आहे. यातील पात्रांची नावे आणि प्रसंग बुद्धपरंपरेशी नाते सांगणारे आहे. याशिवाय यातील श्रीरंग सरकारच्या संवादातून आलेले आचार, विचार आणि धम्मविषयक भूमिका व्यक्त होतात. कादंबरीभर याच्या खुणा लेखिकेने पेरलेल्या जाणवतात.

डॉ. माया परते-रंभाळे

९९७०२३७२२१

आंबेडकरवादी ज्येष्ठ लेखिका सुजाता लोखंडे यांची 'विनाशपर्व' ही सामाजिक कादंबरी नुकतीच साहित्य प्रांतात दाखल झाली आहे. सरदार कुटुंबातील चार पिढ्यांचे वर्णन करताना लेखिकेने नव्या-जुन्याचा सुंदर मेळ साधला आहे. नात्यांच्या बंध-अनुबंधातूनच ही सुंदर कलाकृती जन्माला आली आहे. लेखिकेचे जागृत समाजभान, वास्तवाची जाण, अंतर्मनातील जाणीव नेणिवांचा घेतलेला मागोवा, घटनांची संवेदनशील मनाने घेतलेली नोंद आणि त्यावर केलेले विचारमंथन, या सर्वांचा सुंदर मिलाफ कादंबरीमध्ये जाणवतो. बाह्य जगातील अनुभवांनी तावून सुलाखून निघालेले, पोळलेले मन, अंतर्मनातील स्पंदनं यांच्या आधारे लेखिकेने अनुभवविश्वाचा आत्मशोध घेतला आहे. लेखिका सुजाता लोखंडे म्हणतात, प्रगतीपथावर पांथस्थ म्हणून युगपुरुषांकडून अधोरेखित केलेली स्त्री धम्म पायदळी तुडवून त्यागलेल्या अनिष्ट, रूढी, परंपरा, देवधर्म, चालीरीती स्वीकारताना दिसते आणि मग सुरू होते विनाशपर्व... या विधानातच कादंबरीचे कथाबीज दडलेले आहे असे मला वाटते.

'विनाशपर्व' ही सुजाता लोखंडे यांची सामाजिक कादंबरी ज्ञानपथ प्रकाशनाने प्रकाशित केली असून तिचे आशयघन आणि देखणे मुखपृष्ठ वाचकाचे लक्ष वेधून घेते. कादंबरीचे शीर्षक 'विनाशपर्व' हे कथानकाचा गाभा

अधोरेखित करणारे असून वाचकाच्या मनात कादंबरीविषयी कुतूहल निर्माण करते. विनाशपर्व म्हणजे विनाशाचा काळ किंवा विध्वंसाचा टप्पा. ज्या काळात एखाद्या व्यक्तीचा, समाजाचा, संस्कृतीचा किंवा व्यवस्थेचा ऱ्हास व विनाश होतो त्या काळाला 'विनाशपर्व' असे म्हणता येते. 'पर्व' या शब्दामुळे विनाशाला केवळ एक घटना न मानता, जीवन प्रवासातील निर्णायक अध्याय, सत्र किंवा सर्ग असे स्वरूप प्राप्त होते. म्हणूनच कादंबरीचे 'विनाशपर्व' हे शीर्षक वाचकाच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करते. कशाचा विनाश? कोणाच्या आयुष्यातील विनाश? या विनाशामागची कारणे कोणती? यासारख्या प्रश्नांमुळे वाचक कथानकाशी जोडला जातो. हेच प्रश्न वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवतात. मानवी मूल्यांचा ऱ्हास आणि माणुसकीचा अंत घडवून आणणारा काळ म्हणजे विनाशपर्व. या अर्थानेही या कादंबरीशी हे शीर्षक समर्पक नाते सांगते. कादंबरीला डॉ. सुनंदा जुलमे यांची विस्तृत आणि आशयपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. आंबेडकरी विचारवंत आणि लेखक यशवंत मनोहर यांनी कादंबरीची पाठराखण केली आहे.

सुजाता लोखंडे यांच्या 'विनाशपर्व' या सामाजिक कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे तिची कथात्मशैली. त्यासोबतच जोरकस वर्णनशैली, संवादशैली आणि निवेदनशैली यांच्या प्रभावी वापरामुळे कादंबरीला एक वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे. ही एक शोकात्म कादंबरी आहे. यासोबतच अनेक ठिकाणी लालित्यपूर्ण शब्दयोजनेने नटलेली लेखिकेची शैली वाचकाला एका वेगळ्या भावविश्वात घेऊन जाते. त्यांच्या लेखनीतील संवेदनशीलता आणि प्रसंगांचे सूक्ष्म आकलन वाचकाला अनुभव समृद्ध करते.

कादंबरीच्या सुरुवातीलाच सरदार कुटुंबातील पात्रांचा परिचय करून देताना लेखिका कादंबरीची नायिका रत्ना अर्थात बाई हिच्या आत्महत्येचा प्रसंग मांडतात. हा प्रसंग मन सुन्न करणारा आहे. परंतु मुलं आणि भाऊ सोडून सर्वांच्या नजरेत बाईविषयीचा विखार दिसतो. कौसलच्या संवादातून हा विखार प्रकर्षाने व्यक्त होतो. 'कार्तिकेची काय दुर्दशा केली वं तुया सुनेनं या घराची.. नांदत्या घराचं पार स्मशान केलं वं माय. बरं झालं तू लवकर गेलीस. नाहीत् घराची दुर्दशा पाहून झुरत रायतीस माय.' या वाक्यातून कादंबरीच्या पुढील कथानकाविषयी वाचकाच्या मनात उत्सुकता निर्माण होते. एवढं काय आणि कसं झालं असेल असा प्रश्न वाचकाच्या मनात रुंजी घालतो. या एका संवादातूनच लेखिका पुढील कथानकाची पूर्वसूचना देतात. सुरुवातीच्या अठरा पानानंतर कथानक भूतकाळात (फ्लॅशबॅक) शिरते. एका स्त्रीच्या स्वभावामुळे आणि वर्तनामुळे एका सुखी, संपन्न कुटुंबाची झालेली अधोगती व उद्ध्वस्तता लेखिकेने यातून चित्रित केली आहे.

लेखिकेने ही कादंबरी लिहायला घेतल्यापासूनच त्या कादंबरीच्या विषयाची चर्चा ऐकली होती. त्यामुळे कादंबरीविषयी उत्सुकताही निर्माण झाली होती. कादंबरी हाती येताच अधाशासारखी दोन दिवसांत ती वाचून संपवली. त्यातील प्रसंग, कथानक, पात्रे, घटना, वातावरण, नाती, द्वेष, कलह, राग या भावभावनांचे चित्रण वाचताना मन अस्वस्थ होते. यातील भावनांचा होत जाणारा चुराडा, जिवाची घालमेल, मूल्यांचा ऱ्हास, खोट्या प्रतिष्ठेची झूल पांघरून वावरणारे महाभाग सर्व आपल्या परिचयाचे वाटू लागतात. कादंबरी वाचताना हे सर्व आपल्या आजूबाजूचेच चित्र असल्याचा भास होतो. नव्हे, ते प्रसंग, घटना डोळ्यासमोर जिवंत उभ्या राहतात. प्रत्येक पात्र, प्रसंग आपल्यातीलच एक आहे असेच जणू वाटत राहते. समाजात वावरताना पावलोपावली दिसणाऱ्या वास्तवाची उजळणी या कादंबरीच्या वाचनातून होते. भावभावनांवर होणारे आघात आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो आणि अनेकदा ते मूकपणे सहनही करतो. या सर्व अनुभवांचे प्रतिबिंब कादंबरीत उमटलेले आहे. कादंबरीचे वाचन करताना डोळ्यात अश्रू आणि मनात कारुण्य दाटून येते. हीच कादंबरीच्या भावनिक परिणामतेची साक्ष आहे.

'विनाशपर्व' ही मानवी मूल्यांचा ऱ्हास, खोटी प्रतिष्ठा, सामाजिक विसंगती, नात्यांचे विघटन आणि अंधश्रद्धा या सर्वांवर भाष्य करणारी एक सामाजिक कादंबरी आहे. यात लेखिकेने वास्तवासोबतच कल्पनेचा समर्पक वापर करत दोन्ही एकमेकांत मिसळून जाव्या इतका

सुंदर अनुबंध निर्माण केला आहे. वास्तवाच्या व्यसनाला कल्पनेचा जरतारी पदर यांचा सुंदर मेळ साधत त्यांनी वाचकाला विज्ञाननिष्ठा, मानवतावाद, समाजवाद, सामाजिक जाणीव यासारख्या मूल्यांचा विचार वाचकांपर्यंत पोहोचविला आहे. लेखिकेने अंतर्मनातील खळबळ, समाजाविषयीचा कळवळा, समाजऋणाची जाणीव या सगळ्यांचा मागोवा घेत विवेक, परिवर्तनासोबतच शांती, संयम, विश्वास, समाधान, प्रेम यांचा मार्ग सुचविला आहे. ही कादंबरी लिहिताना लेखिकेच्या विचार विश्वावर संपूर्णतः बुद्धविचार, आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आणि धम्म यांचा प्रभाव जाणवतो. आंबेडकरी विचारांची छाप लेखिकेच्या शब्दांशब्दातून आणि संवादातून जाणवते. कादंबरीतून ठिकठिकाणी याच्या खुणा स्पष्ट उमटलेल्या दिसतात.



कादंबरीची नायिका रत्ना (बाई) आणि नायक माणिक (भाऊ) हा आहे. याशिवाय कादंबरीमध्ये गंगाराम, सायजा, श्रीरंग, कार्तिकी, प्रज्ञा, नालंदा, तक्षशिला, सखुमावशी, युवराज, अमेय, अनुराग, दीक्षा या मुख्य पात्रांसोबतच काही उपपात्रेदेखील येतात. एकंदरीत सरदार घराण्यातील चार पिढ्यांची ही कथा आहे. विदर्भातील परिसरात घडणाऱ्या या कथानकातून कौटुंबिक नातेसंबंध स्वभाव वैशिष्ट्ये आणि सामाजिक परिस्थिती यांचे चित्रण केले आहे. एका स्त्रीच्या आतताई, स्वार्थी, आक्रमक, लोभी, विध्वंसक स्वभावामुळे एका संपूर्ण कुटुंबाची कशी वाताहत होऊ शकते, हे कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. कादंबरीची नायिका बाई वास्तवाचे भान न राखता आकांक्षा, प्रतिष्ठा, बडेजाव यांचा मुखवटा घालून वावरताना दिसते. तिची स्वैर वृत्ती, माहेरचा ध्यास, स्वप्नरंजन, खोट्या, उपऱ्या भावभावनांचा खेळ सर्व कुटुंबाला त्रासदायक ठरतो. एकंदरीत गुणांपेक्षा बाईच्या दोषांचे पारडं अधिक जड असलेलं दिसून येतं. शारीरिक, मानसिक पातळीवर लेखिकेच्या मनातील भावनांची आंदोलने लेखिकेने या पात्रांच्या माध्यमातून अगदी योग्य पद्धतीने व्यक्त केली आहेत. सोबतच श्रीरंग सरदाराच्या माध्यमातून लेखिकेच्या भावनांचे झालेले सशक्तिकरण कादंबरी वाचताना ठिकठिकाणी जाणवते. भाऊची निष्क्रियता आणि बाईची आत्मकेंद्री वृत्ती या दोन्ही गोष्टी कुटुंबाच्या विनाशास कारणीभूत ठरतात. समाजाचे मापदंड झुगारून, अहंमान्यतेचा बुरखा पांघरून यातील नायिका संपूर्ण कुटुंबाचे सुख, शांती, नावलौकिक, सासऱ्यांनी कमावलेली इस्टेट सर्व धुळीस मिळवते; तर भाऊच्या स्वभावातील मूढपणा, द्वंद्वात्मकता, मतिभ्रष्टता, विरोध न करण्याची वृत्ती, कुटुंबावरचे अति प्रेम या सर्व गोष्टीदेखील विनाशास कारणीभूत ठरतात. नात्यांच्या या परिघात विविध भावभावनांचे कल्लोळ अनुभवास येतात. सोबतच भावनांची आंदोलनेदेखील लेखिकेने तितक्याच ताकदीने उभी केली आहेत. नात्यांच्या काही दाट तर काही विरळ सावल्या, विचारांची, भावनांची आंदोलनं, अंतर्मनातील पडघम, घड्याळाच्या लोलकाप्रमाणे इकडून तिकडे फिरत जगण्याची धडपड करणारी माणसं, संघर्ष, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, स्वाभिमानाची कुचंबना सर्व बाबी कादंबरीला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतात. यातील अनेक प्रसंग, विचारांना धार आहे. जे समाज परिवर्तनासाठी निश्चितच उल्लेखनीय ठरतील. नात्यातील आकस, पक्षपाती वृत्ती, द्वेष, स्वार्थ, लोभ या नकारात्मक गोष्टींसोबतच भाऊचे बहिणींवरील प्रेम, आदर, कार्तिकी, श्रीरंगमधील स्वाभिमान, बाबासाहेबांच्या विचारांचा आदर, श्रद्धा, अपार कष्ट करण्याची तयारी, श्रीरंगची शिस्त यांसारख्या सकारात्मक बाजूही कादंबरीत येतात. यातील परस्पर विरोधी भावनांमुळे पात्रांचे जग अधिक गुंतागुंतीचे आणि वास्तवदर्शी बनले आहे.

कादंबरी वाचताना लेखिकेवरील आंबेडकरी विचार

आणि बुद्ध तत्त्वज्ञानाचा असलेला प्रभाव वारंवार जाणवतो. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला मूलमंत्र विसरून एखादी व्यक्ती जेव्हा अनिष्ट रूढी, परंपरा, देवभोळेपणा, कर्मकांड या गोष्टींच्या आहारी जाते तेव्हा तिची मती भ्रष्ट होऊन ती स्वतःच्या विनाशास स्वतःच कारणीभूत ठरू शकते. यावर श्रीरंगच्या माध्यमातून लेखिकेने जळजळीत भाष्य केले आहे. यातील पात्रांची नावे आणि प्रसंग बुद्धपरंपरेशी नाते सांगणारे आहे. याशिवाय यातील श्रीरंग सरकारच्या संवादातून आलेले आचार, विचार आणि धम्मविषयक भूमिका व्यक्त होतात. कादंबरीभर याच्या खुणा लेखिकेने पेरलेल्या जाणवतात. जन्माच्या किंवा मृत्यूच्या प्रसंगी करण्यात आलेले विधी, सोपस्कार बौद्ध परंपरेशी नाते सांगून आहेत. बौद्ध धर्माच्या बावीस प्रतिज्ञांची आठवण करून देत लेखिकेने जो या प्रतिज्ञांना विसरला तो कसा विनाशास कारणीभूत ठरतो यावर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. लेखिका म्हणते, काही विनाश हे घरांच्या भिंती कोसळवतात; तर काही मनाच्या पायाभरणीला हादरवून सोडतात हे अगदी खरं आहे. हे विधान कादंबरीच्या आशयाशी अतिशय जवळचे नाते सांगते. समाजात अशा प्रकारचे वास्तव अनेक ठिकाणी दिसून येते.

स्त्री हा कुटुंबाचाच नव्हे तर समाजाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे समाजभान जागृत ठेवून स्त्रीने संपूर्ण कुटुंबाचा सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, भावनिक विकास यासोबतच अधिकारांचे पोषण करणे गरजेचे आहे; तरच कुटुंबाची, पर्यायाने समाजाची प्रगती होऊ शकते. हा मोलाचा विचार लेखिकेने या कादंबरीच्या माध्यमातून समाजात प्रसृत केला आहे.

लेखिकेने कादंबरीतून केवळ कल्पनेच्या भराऱ्या न मारता समर्पक शब्दयोजनेसोबतच दृष्टांत, रूपकं, प्रतिमा, प्रतीकं, अलंकार, वाक्प्रचार, कवितांच्या ओळी यांची सुबक पेरणी केल्याने कादंबरीच्या सौंदर्यात भर पडली आहे. पात्रांचा, परिस्थितीचा कितीही राग आला तरी कादंबरीत कुठेही बीभत्सपणा किंवा असभ्य, अनैतिक शब्दांचा जागर न करता उचित आणि संयत शब्दरचना वापरली आहे. समरसून आलेली निसर्गवर्णनं हीदेखील प्रसंगानुरूप चपखल बसली आहेत. कादंबरीतील प्रसंगांशी, घटनांशी तादात्म्य साधून लिहिलेले हे कथानक निश्चितच वाचकाच्या मनाचा तळ ढवळून काढते. सोबतच वाचकाला अंतर्मुख करते तर कधी डोळ्यांच्या कडाही ओलावते. बाईच्या वर्तनाविषयी राग तर येतोच, पण भाऊच्या षंढपणाचाही तिरस्कार वाटतो. ही पात्रे वाचकाच्या भावविश्वाला झंझोडून टाकणारी आहेत. हे सर्व लेखिकेच्या मांडणीचे सामर्थ्य अधोरेखित करते. कादंबरीतील पंढरीची वारी, कान्होपात्रेच्या झाडाचा प्रसंग वाचकांना अवास्तव वाटण्याची शक्यता आहे. मात्र समाजात विविध प्रकारचे अनुभव आणि प्रवृत्ती आढळतात. वाचकही जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन कलाकृतीचा विचार करत असतो. त्यामुळे हे प्रसंग लेखिकेने समाजवास्तवाचे व्यापक चित्र उभे करण्यास गरज म्हणून वापरलेले आहेत असे मला वाटते. चित्रशैली व गद्यशैलीचा लवचिकपणे वापर करून लेखिकेने वाचकांच्या मनोव्यापाराला यातून स्पर्श केला आहे. त्यामुळेच यातील प्रसंग अधिक जिवंत आणि उठावदार झाले आहेत.

एकंदरीत 'विनाशपर्व' ही सामाजिक आशयाची आणि वैचारिक बैठक असलेली कादंबरी उत्कृष्ट झाली आहे. सर्जनशीलतेच्या अंगाने विचार केल्यास ही कादंबरी समाज परिवर्तनाच्या क्रियाकलापात महत्त्वपूर्ण विचार परिवर्तन घडवून आणू शकते. लेखिका म्हणतात, विनाशपर्व ही केवळ कादंबरी नाही तर एका वैचारिक युद्धाचा प्रारंभ आहे. या विधानातून कादंबरी लेखनामागची वैचारिक भूमिका स्पष्ट होते. समाज परिवर्तनासाठी सातत्याने असे विचारमंथन होणे गरजेचे आहे. रूढी, अंधश्रद्धा, खोटी प्रतिष्ठा आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास याविषयी प्रश्न उपस्थित करणारे साहित्य समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देते. लेखिका सुजाता लोखंडे यांची 'विनाशपर्व' ही कादंबरीदेखील वाचकाला अंतर्मुख करते. सामाजिक वास्तवाकडे पाहण्याची नवी दृष्टी देते आणि परिवर्तनाच्या दिशेने विचार करण्यास प्रवृत्त करते. या कादंबरीच्या माध्यमातून लेखिकेने सामाजिक विचार मंथनाच्या प्रक्रियेत मोलाची भर घातली आहे. त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!



गाढवी सोनार समाज भाग-२

गाढवी सोनार या समाजात जात पंचायत खूप प्रभावी होती. प्रत्येक उपजातीचे (सहा) एक पंच याप्रकारे जात पंचायतचे गठन होत होते. लग्न करताना पाच पंच उपस्थित राहणे अनिवार्य होते. पूर्वी लग्नात पंचांना मटन व दारू देण्याची पद्धत होती. गाढवी सोनार समाजात जात पंचायती नियम फार कडक होते. सहजासहजी या नियमांचा भंग कुठलाच परिवार करीत नसे, असे झाले तर जात पंचायत त्या कुटुंबावर दंड आकारत असे. अनेक विषयांत कुटुंबाला बहिष्कृत करण्याचासुद्धा जात पंचायत निर्णय देत असे व संपूर्ण समाज तो निर्णय मुकाट्याने मान्य करीत असे. आजच्या आधुनिक काळात हे सर्व नियम समाजाला पाळणे अत्यंत कठीण आहे.

राहुल चव्हाण
८१४९२०१२१४

गाढवी सोनार हा मुळात क्षत्रिय समाज आहे. राजस्थानमध्ये महाराणा प्रताप यांच्यासोबत सेवेकरी व आवश्यकता पडेल तेव्हा युद्ध करण्यासाठी सज्ज अशी ही जात. मेवाडच्या पराभवानंतर सर्वांना जंगलात आश्रय घ्यावा लागला. तेव्हा या समाजाने शस्त्र, तलवारी, भाले बनवण्याची कला अवगत केली व राजासाठी शस्त्र बनण्याचे काम स्वीकारले. कालांतराने मेवाड पुन्हा जिंकण्याची चिन्हं दिसत नव्हती, परिस्थिती संपूर्ण बदलली होती. इस्लामचे दुष्टचक्र सुरू होते. आपला धर्म व आई-बहिणींचे रक्षण करणे हे प्रथम कर्तव्य झाले होते. त्यावेळेस अनेक समुदायांनी मेवाड पुन्हा मिळवण्याची शपथ घेऊन स्थलांतर केले, जिथे आश्रय मिळेल तिथे पलायन केले. त्यामध्ये गाढवी सोनार समाजसुद्धा होता. या समाजाला शस्त्र बनवण्याची कला अवगत होतीच. या समाजाने सोने-चांदीचे आभूषण व विविध वस्तू बनवण्याची कला अवगत केली व त्यावर आपला उदरनिर्वाह हा समाज करू लागला. गाढवी सोनार या समाजातील काही जाणकार लोकांचे मत आहे की, या समाजाला ही कला आधीपासूनच अवगत होती. आता केवळ गावा-गावात जाऊन आभूषणे बनवण्याचे काम हा समाज करू लागला. अभ्यासकांच्या मते भटकंती स्वीकारण्यामागची दोन कारणे असू शकतात. एक तर

एका गावात दीर्घकाळ व्यवसाय मिळत नसल्यामुळे गावागावात भटकंती करावी लागे आणि दुसरे कारण इस्लामी आक्रमणामुळे या समाजाने भटकंती स्वीकारावी लागली. कारण काही असली तरी हा समाज प्राचीन काळापासून भटकंती करतो आहे हे मात्र निश्चित. गावाच्या बाहेर आपली पाले टाकायची, महिलांनी गावात जाऊन अंगठी, जोडवे दुरुस्त करायचे आहे का? अशी दवंडी द्यायची, मग पुरुषाने जाऊन सर्व सोनारी कामे करायची. त्या गावात सात ते आठ दिवस झाले की पुन्हा आपले बिऱ्हाड जमा करायचे. ते गाढवावर लादायचे व दुसरे गाव जवळ करायचे. अशी अनेक वर्षे भटकंती केली म्हणून या समाजाला कर्नाटकात बैलपट्टार तर आंध्र प्रदेशमध्ये बैलअशार आणि महाराष्ट्रात गाढवी सोनार म्हणतात. कालांतराने या समाजाच्या व्यवसायात बदल होत गेले. सोन्या-चांदीचे आभूषण निर्माण करण्याच्या कामांमध्ये कमतरता आल्यानंतर हा समाज लाचकन, (काटा काढण्यासाठी वापरण्याची वस्तू) कानकोरणे, सांडसी, उलथाना, बोरखडी इत्यादी वस्तू हा समाज बनवू लागला. काही काळानंतर हा समाज भांडे विकण्याचा व्यवसायसुद्धा करू लागला. आजसुद्धा अनेक व्यक्ती भांडे विकण्याचा व्यवसाय करतात. असे असले तरी आजसुद्धा या समाजात अनेक कुटुंबांना शस्त्रे बनवण्याची कला अवगत आहे.

हा समाज आपली मुख्य देवस्थान यादगिर जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील चिंचणी या गावातील माणकेश्वर देवस्थानला मानतो. अशी मान्यता आहे की, इथेच या समाजाला सोन्या-चांदीचे आभूषण बनवण्याची कला शिकवली गेली. आजही श्रावण महिन्यात संपूर्ण समाज दर्शनासाठी तिथे एकत्र येतो. याप्रसंगी विविध अवजारांची पूजा केली जाते. हा समाज काळम्मा देवी आपले कुलदैवत मानतो. काळम्मा देवीची पूजा म्हणजे शस्त्रांची पूजा असते. भटक्या समाजाप्रमाणे या समाजातसुद्धा देवदेव करण्याची प्रथा आहे. गाढवी सोनार समाजात देवदेव करण्यासाठी रानात सटवाई देवीचे

वाचकांच्या आग्रहास्तव नारायणी ग्रंथ पुनःप्रकाशित होत आहे.

•॥ नारायणी ॥•

विवेक प्रकाशन

प्रकाशन : ऑक्टोबर २०२४ किंमत : ६००/-रु. । सवलत मूल्य : ५००/-रु.

अनन्य भक्तकुळांची स्वामिनी कोल्हापूरची **'श्री महालक्ष्मी'** म्हणजेच दक्षिणकाशीचे दर्शन या 'नारायणी' ग्रंथाद्वारे आपणास घडणार आहे. श्रीचे माहात्म्य, मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना, मुख्य मंदिरासह परिसर मंदिराचे रंगीत छायाचित्रं. उपासना विभागात श्री महालक्ष्मी स्तोत्रे, सूक्त, कवच, अथर्वशीर्ष, सहस्रनामावली, श्रीयंत्र माहिती व पूजाविधी, ऋषीमुनींनी केलेली स्तुती यांच्या पठणाने श्रद्धेची अनुभूती आपण घेणार आहोत. १२५-१५० रंगीत फोटोद्वारे श्री महालक्ष्मीची विविध रूपातील पूजा, सुवर्ण पालखी, रजत रथोत्सव, अत्यंत दुर्मिळ व पुरातन 'श्रीं' च्या अलंकाराचे मनोहारी दर्शन या ग्रंथाद्वारे घडणार आहे. दैनंदिन पूजा, करवीर यात्रा, नवरात्रोत्सव या सर्वांचे नयनरम्य दर्शन या ग्रंथाद्वारे आपणास होणार आहे.

असा परिपूर्ण ग्रंथ मान्यवरांनी नावाजलेला, शंकराचार्यांचा आशीर्वाद लाभलेला ग्रंथ पूर्णतः रंगीत आर्टपेपरवर पुनः प्रकाशित होत आहे.



Accounts details. - HINDUSTHAN
PRAKASHAN SANSTHA
BANK OF MAHARASHTRA
Branch : PRABHADEVI
A/C no. : 20109800154
IFSC no : MAHB0000318

संपर्क : ९५९४९६१८५८

पूजन करण्याची परंपरा आहे. त्यावेळेस प्रति गोत्र बोकड देण्याची पद्धत आहे. गाढवी सोनार समाज मांसाहारी असला तरी या समाजात डुकराचे व गाईचे मांस खाण्यास मनाई आहे. या समाजात एकूण सात उपजाती असून प्रत्येकाचे कुलदैवत वेगवेगळे आहे.

कुळ कुलदैवत

१) प्रधान – माणकेश्वर माता

२) गरड – राणूबाई (बिजापूर)

३) अंकोशी– महालक्ष्मी

४) पंचमे – टेमलाई (कोल्हापूर), तुळजापूर

५) सपोद – सौंदती यल्लमा, कर्नाटक

६) भानजोड – तुळजाभवानी

७) मोकलाद – दुर्गम्मा, गजेंद्रगड कर्नाटक

या समाजात गरड या उपजातीला उच्च मानले जाते. त्यांना या समाजात पाटील म्हणतात. सातवी उपजात मोकलाजी हिला कनिष्ठ उपजात मानली जाते. या जातीला कुठलाही विधी करण्याचा अधिकार नाही. तसेच या उपजातीचा व्यक्ती जात पंचायतमध्ये पंच होऊ शकत नाही. आजसुद्धा या सर्व गोष्टींचा प्रभाव गाढवी सोनार दिसतो. भटक्या समाजाप्रमाणे गाढवी सोनार समाजातसुद्धा टाक बनवण्याची परंपरा आहे. हे टाक समाजातील मृत व्यक्तीच्या नावाने बनविले जाते.

हे टाक घरातील वरिष्ठ व्यक्तीकडे असते. टाक घरामध्ये उंचवट्यावर कापडात बांधून ठेवले जाते. सहजासहजी त्याला कोणाचा स्पर्श होऊ नये हे त्यामागील कारण. देव देव करण्याच्या वेळेस टाक खाली उतरवून पूजन केले जाते.

गाढवी सोनार समाजात दहन करण्याची प्रथा आहे. या समाजात दहावा दिवस करण्याची पद्धत आहे. यात महिला निधन झाली असेल तर पाठीचा बळी दिला जातो आणि पुरुषाचे निधन झाले असेल तर बोकडाचा बळी दिला जातो. बळी देण्याआधी पाठीला किंवा बोकडाला भोग देऊन गुळाचे गोड पाणी, पुरणपोळी, ताडी, दारूचा नैवेद्य दिला जातो. तिला सर्वजण शरण जातात, मग बळी दिला जातो. हा बळी त्या कुळातील मुलं, मुली, भावकी यांच्यासमोर दिला जातो. बळी दिलेल्या बोकडाचे



मुंडके व चार पाय पूजेत ठेवतात. दुसऱ्या दिवशी परत उत्तरपूजेप्रमाणे चार पाय व मुंडके याचे तुकडे करून गोत्रातील सर्व व्यक्तींना प्रसाद म्हणून देतात. मात्र तत्पूर्वी ज्यांनी उपास केला असेल त्यांनी उपवास सोडायला हवा. यानंतर हा विधी संपुष्टात येतो.

गाढवी सोनार या समाजात जात पंचायत खूप प्रभावी होती. प्रत्येक उपजातीचे (सहा) एक पंच याप्रकारे जात पंचायतचे गठन होत होते. लग्न करताना पाच पंच उपस्थित राहणे अनिवार्य होते. पूर्वी लग्नात पंचांना मटन व दारू देण्याची पद्धत होती. गाढवी सोनार समाजात जात पंचायती नियम फार कडक होते. सहजासहजी या नियमांचा भंग कुठलाच परिवार करीत नसे, असे झाले तर जात पंचायत त्या कुटुंबावर दंड आकारत असे. अनेक विषयांत कुटुंबाला बहिष्कृत करण्याचासुद्धा जात पंचायत निर्णय देत असे व संपूर्ण समाज तो निर्णय मुकाट्याने मान्य करीत असे. आजच्या आधुनिक काळात हे सर्व नियम समाजाला पाळणे अत्यंत कठीण आहे. या समाजात

मुलाच्या जन्मानंतर पालकाला परंपरेप्रमाणे अन्नदान करावे लागते आणि त्यात सात पैकी पाच उपजाती उपस्थित असणे आवश्यक असते. या प्रसंगानंतरच या मुलांची नावे समाजाच्या यादीत जोडली जातात. गाढवी सोनार समाजात उपनयन संस्कारशिवाय पुरुषाचे लग्न होत नाही. या समाजात महिला प्रौढत्व सोहळा केला जातो. तिला सात दिवस कडक विलीनीकरण पाळावे लागते.

विवाहित महिलांना सासरे आणि मोठ्या दिरापासून दहा फूट अंतर ठेवून वागावे लागते. चुकून जरी महिलेने मोठ्या दिराला स्पर्श केला तर जात पंचायत दंड आकारते. कदाचित हा नियम करण्यामागे समाजातील, नात्यांमधील पवित्रता कायम राहावी हा असावा. गाढवी सोनार या समाजात कुटुंब नियोजन, कोणतीही शस्त्रक्रिया केली जात नाही. अन्यथा समाजातून पूर्णपणे त्याला बहिष्कृत केले जाते. दवाखान्यात मृत्यू होणे, शवविच्छेदन करणे याला समाजामध्ये परवानगी दिली जात नाही, त्याला ते अपवित्र मानतात. हा नियम तोडला तर समाजामध्ये पूर्णपणे त्या कुटुंबावर बंदी घातली जाते. कदाचित जुन्या काळात काहीतरी कारणाने हे नियम आले असतील. हे सर्व नियम योग्य की अयोग्य, हा चर्चेचा विषय राहू शकतो. परंतु सध्याच्या युगात या सर्व गोष्टी कालबाह्य झाल्या आहेत हे मात्र निश्चित.

या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाजातील अनेक व्यक्तींनी प्रयत्न केले. लोणंद येथील रतन झारेकरी, पुणेकर, रामा प्रधाने, संगमनेर येथील रामा शेठ, मिरज येथील भीमराव व बाळाप्पा, पुणे येथील अमृत सोनार व लोणंद येथील शत्रुघन प्रधाने इत्यादी व्यक्तींनी समाजासाठी खूप परिश्रम केले, परंतु अवघ्या १५ हजार लोकसंख्या असलेल्या अशा समाजाचे शासन–प्रशासन ऐकत नसते हा आपला जुना अनुभव आहे. समाजातील गरिबी, अज्ञान, शिक्षणाचा अभाव असल्यामुळे या समाजातील व्यक्तींनी शाळेत किंवा अन्य ठिकाणी नोंदी करताना चुकीच्या नोंदी केल्या आहेत. झारेकरी, सोंझारी, सोनार इत्यादी नोंदी केल्यामुळे या समाजाला जात दाखला मिळण्यासाठी प्रचंड अडचणी येतात. हा समाज म्हणतो की आम्ही गाढवी सोनार आहो, आमची ओळख, संस्कृती, प्रथा –परंपरा वेगळ्या आहेत. आम्हाला त्या कायम ठेवायच्या आहेत. यासाठी हा समाज आजसुद्धा संघर्ष करतो आहे. या समाजात शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. त्याच्यामध्ये मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी आहे. उच्चशिक्षित मुलगी औषधालासुद्धा सापडणार नाही. पूजा अमृत सोनारसारखी एखादीच मुलगी उच्च शिक्षण घेण्याचा प्रयत्न करते. अनेक राजकीय पक्षांनी या समाजाचा आपल्या स्वार्थासाठी, मोर्चे काढण्यासाठी व उपोषणाला बसण्यासाठी उपयोग केला. बाळकृष्ण रेणके यांनी या समाजाला घेऊन जंतर मंतर आंदोलन केले होते. श्रीमती सोनिया गांधी यांना भेटून समाजानी आपल्या समस्या मांडल्या होत्या, परंतु या समाजाच्या समस्यांकडे पाहण्याची संवेदनशीलता राजकीय नेतृत्वाजवळ नसल्यामुळे या समाजाच्या पदरी निराशा पडली. आजसुद्धा हा समाज संवेदनशील नेतृत्वाची वाट बघतो आहे.

भटके विमुक्त विकास परिषद
महाराष्ट्र प्रांत प्रमुख

